


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्वच्छ, सुरक्षित, आणि विकसित नगरसाठी
सक्षम हवा, आमदार नवा
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर Abhishek Balasaheb Kalamkar | | |

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.
प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०८.११.२०२४ | अंक नं. २०९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020













# नगरमध्ये चेन स्नॅचिंगच्या घटना सुरुच

## सावेडी उपनगरात पायी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील चेन मोटारसायकलस्वाराने हिसका मारुन पळवली; गुन्हा दाखल

नगर – नगर शहर व उपनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून पुन्हा महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना घडत आहेत. अगोदरच्या अनेक घटनांचा अद्याप तपास लागलेला नसताना गुरुवारी (दि.७) सायंकाळी पुन्हा रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळा वजनाची सोन्याची चेन मोटारसायकलवर आलेल्या चोरट्याने पळविली आहे. सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवर देव गुलमोहर अपार्टमेंट समोर सायंकाळी ५.५० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत अलका रमेश कांबळे (वय ६९, रा. किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड) यांनी रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी अलका कांबळे या गुरुवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास गुलमोहर रोडवर असलेल्या स्वामी समर्थ मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. त्या पुन्हा पायी घराकडे चालत जात असताना ५.५० च्या सुमारास गुलमोहर रोडवर देव गुलमोहर अपार्टमेंट समोर त्यांच्या पाठीमागून मोटारसायकल वर एक अनोळखी इसम आला. त्याने मोटारसायकल फिर्यादी यांच्या जवळ नेत त्यांच्या गळ्यातील सुमारे ५० हजार रुपये किमतीची दीड तोळा वजनाची सोन्याची चेन हिसका मारून तोडली व तो भरधाव वेगात तेथून पसार झाला.

अचानक झालेल्या या प्रकाराने फिर्यादी कांबळे या भयभीत झाल्या. ही घटना त्यांनी त्यांचा मुलगा आशिष याला फोन करून सांगितली. तेथून रिक्षाने तोफखाना पोलिस ठाणे गाठून पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली, तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले आहे. अलका कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### सीसीटीव्ही फुटेज असूनही चोरटे पोलिसांना सापडेनात

जुलै, ऑगस्ट महिन्यात शहरासह उपनगरात १० ते १२ चेन स्नॅचिंगच्या घटना घडल्या होत्या, त्यानंतर सातत्याने अधून मधून चेन स्नॅचिंग होतच आहेत. यातील अनेक घटना या सीसीटीव्ही मध्ये कैद झालेल्या आहेत. त्याचे फुटेजही उपलब्ध आहे. पोलिसांनी ते तपासासाठी ताब्यातही घेतलेले आहे. मात्र त्याचे पुढे काय झाले हे काही समजले नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी डीपीडीसी मधून निधी उपलब्ध करून देत शहरासह उपनगरी भागात सुमारे २०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही बसविले आहेत. तसेच पोलिसांच्या आवाहनानुसार नागरिक, दुकानदार यांनी ही विविध ठिकाणी सीसीटीव्ही बसविले आहेत. त्याचा उपयोग पोलिसांना गुन्हेगारांपर्यंत पोहचण्यासाठी होईल हा या मागील उद्देश होता. मात्र सीसीटीव्ही फुटेज असूनही चोरट्यांचा तपास लावण्यात पोलिसांना अपयश येत आहे.

### महिला वर्गात पसरले भीतीचे वातावरण

गेल्या काही दिवसांपासून शहराच्या विविध भागात वारंवार चेन स्नॅचिंगच्या घटना घडत असल्याने आणि पोलिसांना त्यांचा कुठलाही धागादोरा मिळत नसल्याने शहरासह उपनगरी भागात महिलांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. आता तर हे चोरटे हिंसक बनू लागले असल्याचे काही घटनांमध्ये समोर आले आहे. काही चोरट्यांनी चाकू, कोयत्याचा धाक दाखवून चेन स्नॅचिंग केलेले आहे. त्यामुळे महिला वर्गाच्या मनातील भीती मध्ये वाढ झाली आहे. पोलिसांनी या चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

### या चोरट्यांच्या बिमोडासाठी विशेष पथक नेमण्याची आवश्यकता

नगर शहर परिसरात काही वर्षांपूर्वी चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांनी असाच उच्छाद घातला होता. त्यावेळी तत्कालीन पोलिस अधिक्षक मनोज पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखा, तोफखाना, कोतवाली पोलिस ठाण्यातील काही निवडक पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांचे विशेष पथक नेमले होते. या पथकाने त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस निरीक्षक अनिल कटके यांच्या नेतृत्वाखाली चेन स्नॅचिंगच्या दाखल झालेल्या गुन्ह्यापैकी ३६ गुन्हे उघडकीस आणून २५ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचेकडून एकुण २९ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल त्यात सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली वाहने जप्त केली होती. तशाच पद्धतीने पुन्हा एकदा चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांना पकडण्यासाठी विशेष पथक नेमण्याची आवश्यकता आहे. असे केल्यास या चोरट्यांचा बिमोड करणे शक्य होणार आहे.

# नगर-मनमाड महामार्ग बनलायं 'मृत्यूचा सापळा'

## खड्ड्यांमुळे रस्त्याची झाली चाळण, शासन, प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष

नगर – जगप्रसिद्ध अशा शिर्डी, शनिशिंगणापूरला जाण्याचा प्रमुख मार्ग असलेल्या नगर-मनमाड महामार्गाची सध्याची अवस्था अत्यंत दयनिय झाली आहे. या महामार्गावर विळदपासून ते राहुरीपर्यंत मोठ-मोठे खड्डे पडले असून, खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या रस्त्याने दुचाकीवरून प्रवास करणे म्हणजे जीव धोक्यात घालण्याचे धाडस करण्यासारखे आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे वाहतुकीची वारंवार कोंडी होत असून, खड्ड्यांमुळे वाहनचालकासह नागरिकांच्या मनात 'धडकी' भरत आहे. तथापि प्रशासन आणि राजकारण्यांचे मात्र याकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेले असून, लोकांचे जीव गेल्यानंतर प्रशासन रस्त्याचे काम करणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

नगर-मनमाड महामार्गावरून दररोज शेकडो वाहने आणि हजारो लोक प्रवास करत असतात. परंतु महामार्गाच्या दुरावस्थेकडे शासन आणि प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. अनेक ठिकाणी कामाच्या निमित्ताने रस्त्याची तोडफोड करण्यात आलेली. या रस्त्याने शिर्डी आणि शनिशिंगणापूर देवस्थानला दररोज हजारो भाविक जातात. रस्त्याच्या दोन्ही बाजूने मोठमोठे खड्डे, नाल्या पडल्या आहेत. त्याचबरोबर माती, खडी पसरलेली आहे. विळद बायपास चौकापासून पुढे राहुरीपर्यंतच्या रस्त्याची खड्ड्यांमुळे चाळण झाली आहे. दुचाकी, चारचाकी खड्ड्यात आदळून अपघाताच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यातच या रस्त्याने अवजड वाहतूकही मोठ्या प्रमाणात सुरू असते. त्यामुळे कधी कोणते वाहन अंगावर येईल किंवा कधी कोणत्या वाहनाखाली जाऊन जीव जाईल याची शाश्वती राहिलेली नाही. या रस्त्याने प्रवास करणारे वाहनचालक आणि नागरिक शासन आणि प्रशासनाला शिव्यांची लाखोली वाहत आहेत.

हा महामार्ग असला तरी त्याला गावखेड्यातील रस्त्याचे स्वरूप आले आहे. या रस्त्याने साईभक्त, शनिभक्तांसह कॉलेजचे विद्यार्थी, एम आयडीसीतील कामगार, विखे पाटील हॉस्पिटलमध्ये उपचार घेणारे रुग्ण प्रवास करत असतात. त्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सध्या विधानसभा निवडणूक सुरू झाली आहे. त्यामुळे कोणताही पुढारी, राजकारणी, अधिकारी या रस्त्याकडे ढुंकूनही पहायला तयार नाहीत. तुम्ही रस्त्यावर मरत असाल तर मरा, पण आम्हाला फक्त राजकारण करू द्या, अशीच काहीशी भावना राजकारण्यांची झाली आहे, असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.

# संग्राम जगताप यांनी केलेल्या विकासकामांची परतफेड केडगावमधून मताधिक्य देऊन करणार : सुनील कोतकर

नगर – महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांचे केडगावमध्ये जोरदार स्वागत झाले आहे. केडगावचे सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून अरुण जगताप, आ.संग्राम जगताप हे केडगावच्या विकासासाठी मोठे योगदान देत सर्व नागरिकांच्या पाठीशी उभे असतात. आम्हीपण गेल्या दोन्ही विधानसभा निवडणुकीत लीड देवून त्यांनी केलेल्या कामांची परतफेड करत आहोत. याही निवडणुकीत त्यांना केडगावमधून मोठा लीड देवून त्यांच्या विजयात वाटा उचलणार आहोत, असे प्रतिपादन माजी नगरसेवक सुनील (मामा) कोतकर यांनी केले.



महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचार फेरीस केडगाव मध्ये प्रतिसाद मिळाला. यावेळी नागरिकांशी आ.जगताप यांनी संवाद साधला.

अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी शुक्रवारी सकाळी केडगाव उपनगरात प्रचार फेरी काढून नागरिकांच्या भेटी घेतल्या. केडगाव वेशीजवळ उमेदवार आ.जगताप यांचे ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक सुनील कोतकर, मनोज कोतकर, महेंद्र कांबळे, गणेश ननावरे, राहुल कांबळे, सुनील कोतकर, जालिंदर कोतकर, संजय लोंढे, पोपट कराळे, महेश गुंड, भाजपाचे पंकज जहागीरदार, धनंजय जामगावकर, शरद ठुबे आदींसह परिसरातील नागरिक व महायुतीतील पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उमेदवार आ.संग्राम जगताप म्हणाले, केडगाव उपनगरात सर्व जनतेने माझे उत्स्फूर्त स्वागत केले आहे. केडगाव भागात झालेल्या विकासकामांमुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळेच या भागातून नागरिकांचे मोठे समर्थन मला मिळत आहे. याबद्दल मी केडगावकरांचे आभार मानतो. नगरमध्ये चांगल्या वातावरणात ही विधानसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी असाच उत्स्फूर्तपणा कायम ठेवत येत्या २० नोव्हेंबरला आपला बहुमोल वेळ माझ्यासाठी देवून जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

माजी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले, आ.संग्राम जगताप यांनी केडगावमध्ये विकासकामे केली आहेत. यामध्ये अनेक वर्षांपासून रखडलेला अंबिकानगर ते शाहूनगर रस्त्याचे काम त्यांनी पूर्ण केले आहे. लिंक रोड ते झेंडा चौक रस्त्याचे काम पूर्णत्वास आहे. भूषणनगर ते कल्याण रोड या प्रमुख रस्त्यांचे कामांसह प्रभाग १६ व १७ मधील सर्व अंतर्गत रस्त्यांची कामे आ.जगताप यांनी मार्गी लावली आहेत. केडगावमधील अनेक मंदिरांसाठी आ.जगताप यांनी निधी देवून सभागृह व सुशोभीकरणाची कामे केली आहेत. देवी रोडवरील ओढ्याच्या पुलाचे कामही पूर्ण झाले आहे. आबाल वृद्धांसाठी उद्याने उभारली आहेत. महिलांसाठी अद्ययावत जिम त्यांनी दिली आहे. असे बरेच महत्वाची व प्रलंबित कामे आ.संग्राम जगताप मार्गी लावून केडगावच्या विकासात मोलाची भर घातली आहे, त्यामुळे त्यांच्यावर येथील जनता खुश आहे. या निवडणुकीत त्यांचा विजय निश्चित असून, केडगावमधून त्यांना मोठे मताधिक्य मिळणार आहे.

यावेळी महेंद्र उपाध्ये, महेश सरोदे, सतीश कोतकर, माजी नगरसेवक सुनील काकडे, अजित कोतकर, भरत ठुबे, बहिरु कोतकर, कृष्णा लोंढे, संतोष गाडे, बाळासाहेब पठारे, सुरेश कोतकर, धोंडीराम पठारे, राजू कोतकर, सुजय मोहिते, योगेश कोतकर, नितीन गुंड, दीपक गिरे, सचिन पवार, किशोर जेजुरकर आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

पाहिजेत
अहमदनगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
सेल्समन
जागा : (स्त्री) 5/(पु.) 5
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
विविध ठिकाणचा अनुभव असल्यास प्राधान्य
पगार : 15000/- ते 16000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
पार्टटाईम जॉब जागा 3 (स्त्री)
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह शनिवार ते बुधवार सकाळी 11 ते 1 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## नद्यांचे व सार्वजनिक प्रदूषण थांबवावे लागेल

सामान्यतः आपण सर्वच, निसर्गाला देव मानतो. पूजाअर्चना करतो. नद्या, पर्वत, सूर्य, चंद्र, झाडं, पानफुलं या विविध गोष्टी पूजनीय मानतो. पण एक खंत, सदासर्वदा राहील की काय? भारतातील सर्वदूर निसर्गाची हेळसांड, झाडांची कत्तल, नद्यांतील प्रचंड वाढत जाणारी चिंताजनक अस्वच्छता.

ज्या देशात, समाजात नद्या, पर्वतरांगा या वंदनीय, पूजनीय नाहीत तेथे मात्र त्यांच्या उगमस्थानाचे, काठाचे पावित्र्य जपण्यात आले असून स्वच्छता, नितळ सौंदर्याही अबाधित राखण्यात आले आहे. विशेषतः युरोपियन देश, कमी पाऊस असलेल्या देशांत हे पाहिले व पाळले जाते. आम्ही भारतीय मात्र नद्यांचे, पर्वत, वनजंगले, सार्वजनिक मालमत्तांचे मारेकरी आहोत.

गंगा, यमुना असो की नर्मदा, कृष्णा जवळपास प्रत्येक नदी श्रद्धास्थानी असली

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



तरी त्या त्या नद्यात आपण तेवढ्याच श्रद्धेने कचरा टाकून त्यांना केवळ अस्वच्छच नाही तर अपवित्रही करून ठेवतोय. आपण सर्वजण श्रद्धेने या सर्वांची पूजा करतो. नमस्कार करतो पण त्या नद्यातच पूजा साहित्य, निर्माल्य व कॅरीबॅगा सहजतेने फेकून देतो. गणेश विसर्जनात बाप्पाच्या मुर्त्या वेडेवाकड्या पद्धतीने टाकून (फेकून) देण्यात आम्हाला काहीच कलसे 'फील' होत नाही. आपल्या सीना नदीचंच पाहा ना. का नाही वाटत सीनेचं पाणी झुळझुळ वाहत असावं. त्याच्या किनारी वा बाजूला, छानसं बगीचा, लँडस्कॅरप असावं. निदान घाणीचं साम्राज्य पसरू नये. या चिंताजनक परिस्थितीला बदलायचे असल्यास आपल्याला पुढाकार घेऊन संबंधित यंत्रणेलाही जाब विचारावा लागेल.

# मठ, मंदिर व धार्मिक परिसरातील अनैतिक व्यवसायांवर कारवाई करा

### प्राचीन संस्कृती संवर्धन मंडळाचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

नगर – शहर, उपनगर व जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील मंदिरांमध्ये परिसरातील ग्रामस्थांकडून व अन्य लोकांकडून खेळले जाणारे पत्ते, जुगार व अन्य अनैतिक व्यवसाय मंदिराचे पावित्र्य भंग करत असून यावर पोलीस प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन प्राचीन संस्कृती संवर्धन मंडळाचे संस्थापक बापू ठाणगे यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांना दिले. या निवेदनाची तात्काळ दखल घेत खैरे यांनी संबंधितांना कारवाईचे आदेश दिले आहेत.

निवेदन देण्यापूर्वी बापू ठाणगे यांनी याबाबतची पार्श्वभूमी खैरे यांना सांगितली. याप्रसंगी अजिंक्य गायकवाड, विशाल शितोळे, पत्रकार संजय जोशी व अ‍ॅड. अभिषेक भगत आदी उपस्थित होते.

शहर, उपनगर तसेच तालुका परिसरात विविध देवी–देवतांची तसेच महाराजांची, संतांची मंदिरे आहेत बहुतेकदा सकाळी व संध्याकाळ वगळता अन्य वेळी परिसरातील अल्पवयीन व प्रौढ नागरिक येथे जमतात व पत्ते तसेच जुगार व यासारखे अन्य अनैतिक प्रकार होत असल्याचे आमच्या व परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आले.

याबाबत संबंधितांना वेळोवेळी सांगूनही ही मंडळी त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून आले तसेच अशा प्रकारांना विरोध केल्यास ही मंडळी आक्रमक होऊन त्यातून गाव व परिसरातील शांतता भंग होण्याचे प्रकार घडत आहेत पुष्कळदा असे प्रकार तेथील देवतांच्या आरती व विविध धार्मिक कार्यक्रमांच्या दरम्यान देखील होताना आढळतात.

मंदिरांमध्ये महिला, मुली, अल्पवयीन मुले दर्शनासाठी येत असताना त्यांच्यासमोर असे प्रकार चालू असल्याने त्याचे वाईट परिणाम त्यांच्या मनावर होतात त्यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांची संख्या देखील दिवसेंदिवस रोडावत आहे.

या मंडळींना प्रतिबंध केल्यास त्यातून भांडणे शिवीगाळ असे प्रकार होऊन प्रसंगी मोठ्या उद्रेकाला ग्रामस्थांना तोंड द्यावे लागते अशा तक्रारी ग्रामस्थांकडून केल्या जातात शासनाचे तंटामुक्त अभियान सर्वत्र राबवले जाते मात्र तंटा होण्याच्या या मुख्य कारणाकडे दुर्लक्ष झाले आहे.

सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या या प्रकारांना वेळीच आळा घातला तर परिसरातील शांतता व संवाद टिकून ग्रामस्थांमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मंदिर परिसरात आरती, भजन सप्ताह, कीर्तने व सांस्कृतिक कार्यक्रम असे कार्यक्रम होऊन नव्या पिढीवरती चांगले संस्कार होण्यास मदत होईल. महिला व अन्य अल्पवयीन मुले, मुली यांचा या उपक्रमांमध्ये घटलेला सहभाग पुन्हा एकदा वाढण्यास मदत होईल.

परिसरातील मंदिराचे पंच मंडळ, विश्वस्त, परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत, पंचायत समिती सदस्य, लोकप्रतिनिधी, ग्रामसेवक यांना यासंदर्भात पत्र दिल्यास तेही या प्रकाराला आळा घालण्यास मदत करतील. त्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने याबाबत कारवाई करावी व वारंवार या प्रकाराचा आढावा घ्यावा असे आवाहन यावेळी ठाणगे यांनी केले.

याप्रसंगी खैरे यांनी निवेदन स्वीकारून त्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश संबंधितांना दिले तसेच या केलेल्या सूचनेबद्दल प्राचीन संस्कृती मंडळाचे सदस्य व पदाधिकारी यांचे आभार मानले.

## गळफास घेऊन वृध्दाची आत्महत्या

नगर – एमआयडीसीतील जय मल्हारनगर परिसरातील दक्षिणमुखी मारूती मंदिराजवळ गळफास घेऊन वृध्दाने आत्महत्या केली. अँथनी दामोदर साळवे (वय ५७, रा. वंजारवाडी ता. नेवासा) असे आत्महत्या केलेल्या वृध्दाचे नाव आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अँथनी दामोदर साळवे यांनी गफळास घेतल्याने त्यांना त्यांचा मुलगा विकी साळवे यांनी खासगी वाहनाने येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉ. खेडकर यांनी तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी घोषीत केले. तशी माहिती त्यांनी रुग्णालयात ड्यूटीवर असलेले पोलीस अंमलदार गोर्डे यांना दिली. त्यांनी दिलेल्या खबरीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार थोरवे करत आहेत.

## फुटबॉल स्टेट चॅम्पियनशिपमध्ये नागपूरचा पराभव करून अहमदनगर जिल्हा संघाचा स्पर्धेच्या 'उपांत्य फेरीत' प्रवेश

### ९ नोव्हेंबर रोजी पुणे जिल्हा संघाशी होणार सामना

नगर – शिरपूर (जि. धुळे) येथे सुरु असलेल्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (ज्युनिअर बॉईज) स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीमध्ये अहमदनगर जिल्ह्याच्या संघाने नागपूर जिल्हा संघाचा २–१ गोल फरकाने पराभव करून स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीच्या लढतीमध्ये जिल्हा संघाचा सामना पुणे जिल्ह्याच्या संघाबरोबर होणार आहे. मागील कित्येक वर्षांपासून पुणे, मुंबई, कोल्हापूर आणि नागपूर हे संघ सातत्याने स्पर्धेची उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी गाठत आहेत. आजच्या सामन्यात जिल्ह्याच्या संघाने उत्तम कामगिरी बजावत स्पर्धेतील आतापर्यंतच्या सर्वात धक्कादायक निकालाची नोंद केली आहे.

विजयी संघासाठी भार्गव पिंपळे आणि भानुदास चंद यांनी मध्यंतरापूर्वी १–१ गोल केला.

बचावफळीने उत्तरार्धात सामन्याच्या शेवटपर्यंत उत्तम बचाव करून सामन्यातील आघाडी कमी होणार नाही याची काळजी घेतली.

संघाच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि सहभागी खेळाडूंचे पालक यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून उपांत्य फेरीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हा संघाचे प्रशिक्षक म्हणून झेविअर स्वामी आणि सहप्रशिक्षक म्हणून वैभव मनोदिया हे उत्तम मार्गदर्शन करत आहेत.



## राहत्या घरात गळफास घेत युवकाची आत्महत्या

नगर – राहत्या घरात लोखंडी पाईपला पंचाच्या सहाय्याने गळफास घेऊन युवकाने आत्महत्या केल्याची घटना शहरातील मोहनबाग परिसरात घडली. संदीपकुमार अर्जुन पंडीत (वय २४, रा. मोहनबाग, गायकवाड हॉस्पिटल जवळ, मुळ रा. बिहार) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. संदीपकुमार अर्जुन पंडीत यांनी मंगळवारी (दि.५) रात्री आठच्या सुमारास राहत्या घरात लोखंडी पाईपला पंचाच्या सहाय्याने गळफास घेतला. याची माहिती त्यांच्या मित्राला मिळताच त्यांनी त्यांना उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टर टोके यांनी त्यांची तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाला असल्याचे घोषीत केले. तशी माहिती त्यांनी पोलिसांना दिली. पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास पोलीस अंमलदार एस. पी. गर्जे करत आहेत.

## इंडिया खेलो फुटबॉल अंतर्गत ९ नोव्हेंबरला नगरमध्ये निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

### नमोह फुटबॉल क्लबचा पुढाकार, १७ वर्षाखालील खेळाडूंना संधी

नगर – इंडिया खेलो फुटबॉल अंतर्गत नगरमध्ये नमोह फुटबॉल क्लबच्या माध्यमातून विशेष ट्रायलचे आयोजन करण्यात आले आहे. १७ व १५ वर्षांखालील खेळाडूंना यात सहभाग घेता येणार आहे. या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंना इंडिया खेलो फुटबॉल प्री फायनल स्पर्धेत तसेच दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय फायनल स्पर्धेत खेळण्याची संधी मिळेल, अशी माहिती नमिता फिरोदिया यांनी दिली.

नमोह फुटबॉल क्लब नगरमध्ये फुटबॉलच्या प्रसारासाठी तसेच खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. नमोह फुटबॉल क्लब इंडिया खेला फुटबॉल उपक्रमाचे विभागीय पार्टनर आहे. भारतीय फुटबॉलचा दर्जा वाढविण्यासाठी देशभरातील २० हून अधिक शहरात निवड चाचणी होणार आहे. यात नगरचा समावेश आहे. नगरमधील स्पर्धेत १७ व १५ वर्षाखालील मुलांना तसेच १७ वर्षाखालील मुलींना सहभागी होता येणार आहे. स्पर्धा अशोक भाऊसाहेब फिरोदिया स्कूल फुटबॉल मैदानावर सकाळी ८ वा. होणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – ७२१८१५७४८०.

## नॉर्थ महाराष्ट्र रिजनल टेबल टेनिस स्पर्धेत नगरच्या स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीचे यश



नगर – धुळे येथे २६ व २७ ऑक्टोबर पार पडलेल्या नॉर्थ महाराष्ट्र रिजनल टेबल टेनिस स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंनी यश मिळविले.

११ वर्षे मुलींच्या गटात निरवी देवळालीकर हिने रौप्य पदक पटकाविले. १९ वर्षे मुली आणि महिला ओपन गटात सान्वी जाधव हिने दोन्ही गटात ब्राँझ पदक पटकाविले. १९ वर्षे मुलांच्या गटात सहील करवंदे याने चौथे स्थान मिळवले. सर्व विजयी खेळाडूंना ट्रॉफी व रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आले.

या स्पर्धेत नगर बरोबरच नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार या ठिकाणच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत निधिष भंडारे, वेदांत शितोळे, अलीअसगर टीनवाला या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ केला. सर्व खेळाडूंचे टेबल टेनिस प्रेमींनी अभिनंदन केले. सर्व खेळाडूंना स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीचे मार्गदर्शन लाभले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत शेतमजुराचा जागीच मृत्यू

### नगर–दौंड महामार्गावरील घटना, वाहनचालक पसार

नगर – रस्ता ओलांडणाऱ्या शेतमजुराला भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने त्याचा गंभीर जखमी होवून जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर – दौंड महामार्गावर बाबुर्डी बेंद (ता.नगर) शिवारात हॉटेल श्रावणी समोर गुरुवारी (दि.७) रात्री ११ च्या सुमारास घडली.

साहेबराव वाघमारे (वय ३५, मूळ रा. हिंगोली, हल्ली रा. बाबुर्डी बेंद, ता.नगर) असे मयत शेत मजुराचे नाव आहे. मयत वाघमारे हा बाबुर्डी बेंद (ता. नगर) शिवारात हॉटेल श्रावणी जवळ राहणारे सुजित सुभाष चोभे यांच्या कडे शेतमजूर म्हणून कामाला होता. तो गुरुवारी (दि.७) रात्री ११ च्या सुमारास दौंड महामार्ग ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्यास जोराची धडक दिली. या धडकेत तो गंभीर जखमी झाला.

अपघातानंतर वाहनचालक वाहनासह पसार झाला. गंभीर जखमी वाघमारे यास शेत मालक सुजित चोभे यांनी उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले.

या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



कोलकाता येथे होणाऱ्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी श्रावणी शिनगारे हिची महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल तिचा अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव कैलास शानबाग यांनी सत्कार केला. (छाया – अमोल धोपावकर)

## राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी राज्य संघात श्रावणी शिनगारे हिची निवड

नगर – मुंबई येथे नोव्हेंबरमध्ये झालेल्या राज्यस्तरीय बास्केटबॉल निवड चाचणी घेण्यात आली. या निवड चाचणीत राज्यातील १६ वर्षांखालील सुमारे ९० खेळाडू सहभागी झाल्या होत्या. यातून १२ खेळाडूंची निवड करण्यात आली असून, येथील खेळाडू श्रावणी शिनगारे हिची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. कोलकाता येथे २९ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या दरम्यान राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा होणार असून, या स्पर्धेसाठी वरील महाराष्ट्राचा संघ निवडण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल श्रावणी शिनगारे हिचा अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव कैलास शानबाग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे सहसचिव संजय ढोणे, संजय वायकर, अजिंक्य बोरकर, प्रताप परदेशी, सत्यन देवळालीकर, वेदपालसिंग तन्वर, सुमित कुलकर्णी, गजेंद्र भांडवलकर, सचिन जगताप, अर्जुन मदान, मार्गदर्शक विजय शिनगारे, सचिन भापकर, क्रिकेट कट्टा क्लबचे सचिव उमेश आजबे, राहुल जाधव आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र बास्केटबॉल संघात निवड झालेली श्रावणी शिनगारे ही जिल्ह्यातील एकमेव खेळाडू आहे. त्यामुळे श्रावणी बास्केटबॉलची जिल्ह्यातील पहिली राष्ट्रीय खेळाडू ठरली आहे. ती सावेडी जॉगिंग ट्रॅक येथे एसबीसी क्लबमध्ये सराव करते. तिला सचिन भापकर व विजय शिनगारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## धर्मा मोरे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील (ता.नगर) येथील रहिवाशी धर्मा देवराम मोरे (वय ५५) यांचे ७ नोव्हेंबर रोजी हृदविकाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कृष्णा मोरे यांचे ते वडील होत.

## जीवन प्रमाणपत्र सादर करा अन्यथा पेन्शन बंद होईल

नगर – केंद्र सरकार, राज्य सरकार व इतर आस्थापनातील पेन्शनरांनी नोव्हेंबर अखेर जीवन प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील महिन्यापासून त्यांची पेन्शन बंद होऊ शकते. त्यामुळे सर्व पेन्शन धारकांनी आपले जीवन प्रमाणपत्र तयार करून घ्यावे. कॅड पॉइंट या संस्थेत डिजिटल जीवन प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध असून सर्व सेवानिवृत्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कॅड पॉईंटच्यावतीने करण्यात आले आहे.

११ नोव्हेंबर पासून ही सुविधा सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत उपलब्ध असून सेवानिवृत्तांनी आपले आधार कार्ड, पेन्शन पे ऑर्डर, बँकेचे नाव, खाते क्रमांक, मोबाईल फोन सह कॅड पॉइंट, द्वारा आय. एस.डी.टी. तळमजला, निर्मल चेंबर्स, होर्मो केअर लॅब समोर, लाल टाकी, अहमदनगर येथे संपर्क साधावा.

दरवर्षी नोव्हेंबर अखेर सर्व पेन्शनरांनी त्यांच्या हयातीचा दाखला बँकेत अथवा संबंधित कार्यालयात सादर करणे आवश्यक असते. अन्यथा पुढील महिन्यापासून त्यांची पेन्शन खंडित होऊ शकते. तरी सर्व पेन्शनरांनी असुविधा टाळण्यासाठी विहित वेळेत आपले डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार करणे गरजेचे आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, संरक्षण विभाग, एल.आय.सी., माजी सैनिक, पोस्ट, टेलिफोन, रेल्वे, खाजगी कंपन्या, ईपीएफओ पेन्शनधारक व अन्य आस्थापनातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपली पेन्शन नियमित चालू ठेवावी, असे आवाहन कॅड पॉइंटच्यावतीने करण्यात आले आहे.

आजारी किंवा अतिवृध्द पेन्शनरांसाठी घरी येऊन जीवन प्रमाणपत्र तयार करुन देण्याची सुविधा उपलब्ध असून त्यासाठी ९२७०५५६५५७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# 'दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स'च्या अध्यक्षपदी भारतभूषण भागवत; मानद सचिवपदी डॉ. दीपक विधाते





नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहमदनगर स्थानिक केंद्राच्या अध्यक्षपदी व्हॅल्युअर व चार्टर्ड इंजिनिअर, सल्लागार अभियंता भारतभूषण भागवत यांची तर, मानद सचिव पदी प्राध्यापक डॉ. दीपक विधाते यांची निवड झाली आहे. ही निवड २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी असून २९ ऑक्टोबर रोजी झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उभयतांनी पदाची सूत्रे स्वीकारली.

भारतभूषण भागवत यांत्रिक अभियांत्रिकी पदवीधर असून त्यांनी रीयल इस्टेट मूल्यांकना मध्ये पदव्युत्तर पदवी व वैकल्पिक विवाद निराकरण यंत्रणेची पदविका प्राप्त केली आहे. सुमारे १८ वर्षापासून ते स्थावर मालमत्ता व प्लांट अँड मशीनरी चे रजिस्टर्ड व्हॅल्युअर, प्रत्यक्ष कर मंडल (सीबीडीटी), दिवाळखोरी आणि दिवाळखोरी बोर्ड ऑफ इंडिया (आयबीबीआय) चे नोंदणीकृत मुल्यांकनकर्ता म्हणून कार्यरत आहेत. प्राथमिक आठ वर्षे त्यांनी विविध औद्योगिक कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांवर काम केले. ३६ वर्षे प्रतिष्ठित ब्रँडसच्या स्वदेशी व आयात मशीनरी च्या विपणनाचा, व १२ वर्षे लघू अभियांत्रिकी उद्योग चालवण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. भारतभूषण भागवत अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संलग्न असून अहमदनगर शाखेचे अध्यक्ष आहेत. २००९–२०११ या काळासाठी ते इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहमदनगर केंद्राच्या मानद सचिव पदी कार्यरत होते.

डॉ. दीपक विधाते २२ वर्षांपासून विठ्ठलराव विखे अभियांत्रिकी महाविद्यालय अहमदनगर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून इन्फॉर्मेशन टेक्नॉलजी विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. त्यांचे प्रतिष्ठित देशी व विदेशी नियतकालिकामध्ये ४० हून अधिक शोध निबंध प्रसिद्ध झाले असून चार पुस्तके व पाच इंडियन पेटंट्स त्यांच्या नावावर प्रसिद्ध झाली आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अभ्यासमंडळाचे सदस्य म्हणूनही ते काम पाहत आहेत. डॉ. दीपक विधाते यांनी यापूर्वीही इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहमदनगर केंद्राच्या कार्यकारिणीवर काम केले असून मानद सहसचिव म्हणूनही ते कार्यरत होते.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), या केंद्रीय संस्थेची देश व विदेशामध्ये १२५ हून अधिक केंद्रे आहेत. चर्चासत्रे, व्याख्याने, कार्यशाळा, औद्योगिक भेटी, इ. उपक्रमांद्वारे वेगवेगळ्या शाखांमधील अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी संस्था प्रयत्नशील असते व अभियांत्रिकी क्षेत्रात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाला सहकार्य व मार्गदर्शन करते.

संस्थेच्या अहमदनगर केंद्रामध्ये ११०० कार्पोरेट व २३०० हून अधिक विद्यार्थी सभासद आहेत. संस्थेद्वारे अभियांत्रिकी विद्यार्थी व सभासदांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. नगर–कल्याण रोडवर संस्थेच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. केंद्र शासनाच्या प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियानांतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी संस्थेला शासनाकडून परवानगी मिळाली आहे. कौशल्य विकास केंद्र पूर्ण क्षमतेने चालवणे व इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे यासाठी आपले प्राधान्य असून काम पूर्ण होण्यासाठी सभासदांनी आर्थिक हातभार लावण्याचे आवाहन त्यांनी केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचे मावळते अध्यक्ष मनोहर अणेकर यांनी आपल्या तीन वर्षांच्या कार्यकाळाचा लेखाजोखा सादर केला. अत्यंत कठीण परिस्थितीतही सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या इमारतीचे बांधकाम, प्रायोजित बक्षीस योजना, व कौशल्य विकास केंद्र इ. योजना कार्यान्वित केल्याचे, तसेच आर्थिक दृष्ट्या संस्था सक्षम करण्याचे प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले. मावळते मानद सचिव अभय राजे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी अध्यक्ष प्रकाश गांधी, अविनाश कुलकर्णी, माजी मानद सचिव मधुकर बालटे, राजकुमार मुनोत, हरिश्चंद्र थिगळे, रामनाथ वायकर, तसेच डॉ. दादासाहेब करंजुले, जी. सी. मोटगी, गिरीश धोत्रे, बाबासाहेब खरबस, प्रदीप तांदळे, उदित हिरे, अंसार शेख आदि सभासद उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीला केंद्राचे माजी अध्यक्ष, श्रायडर इलेक्ट्रिक इंडिया चे उपाध्यक्ष अरविंद पारगावकर, माजी अध्यक्ष आरतीभूषण चौधरी व इतर पाहुण्यांनी शुभेच्छा दिल्या.



विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि सुरक्षिततेवरील राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरात सहभागी विद्यार्थी व मास्टर ट्रेनर.

# विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि सुरक्षिततेवरील राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराला प्रतिसाद

### राज्यातील ६५ हजार शाळांना मिळणार लाभ, ३६ जिल्ह्यासाठी ३६ मास्टर ट्रेनर यांना मार्गदर्शन

नगर – महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद व स्किल ट्री लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनाने सुरक्षा आणि सुरक्षितता उपक्रमाचे राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून राज्यातील ६५ हजार शाळांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षतितेच्या दृष्टीकोनाने मार्गदर्शन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद संचालक आर. विमला मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा म्हणजे प्रत्येक जिल्ह्यासाठी एक मास्टर ट्रेनर अशाप्रकारे ३६ जिल्ह्यासाठी ३६ मास्टर ट्रेनर यांचे राज्यस्तरीय प्रशिक्षण मुंबई येथे घेण्यात येत आहे. हे प्रशिक्षण घेतल्यानंतर सर्व मास्टर ट्रेनर जिल्हा परिषदेतील शाळांना सुरक्षा आणि सुरक्षितता या संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. याचा ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांना मोठा फायदा होणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

# ग्राहक संरक्षण समिती छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी सुरेखा भंसाली यांची नियुक्ती



नगर – भारत सरकार द्वारा नोंदणीकृत जिल्हा अध्यक्षा सुरेखा भंसाली यांची छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद येथिल ग्राहक संरक्षण प्रतिष्ठान संचालित ग्राहक संरक्षण समितीच्या जिल्हाध्यक्ष पदावर नियुक्ति करण्यात आली

संरक्षण समितीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दादा केदार नाशिक, डॉ. गंगाराम उबाले, (विदर्भ प्रदेश संपर्क प्रमुख विदर्भ) विभाग कार्य अध्यक्ष ग्राहक संरक्षण समितीच्या डॉ. शालिग्राम चौहान यानी पत्रा द्वारे नियुक्ति केली. ज्यांनी सुरेखा भंसाली यांची शिफारस केली होती. छत्रपति संभाजीनगर औरंगाबाद जिला ग्राहक संरक्षण समितिवर सुरेखा भंसाली यांनी त्यांच्या सामाजिक, राजकीय कार्याशी दखल घेऊन समितीला त्यांचा निश्चित फायदा होणार व ग्राहक संरक्षण समितीसाठी ते सदैव कटिबद्ध राहतील असे सुरेखाभंसाली यांनी सांगितले

सुरेखा भंसालीची नियुक्ति झाल्या बदल महावीर भंसाली, संजय संचेती, बालु सुराणा, पारस बागरेचा, संदीप बांठिया, सीमा सुराणा, नीता गादिया, विद्या खिवसरा, राखी बोरा, शिला पारेख, आरती गुगळे, योगीता चोरड़िया, सीमा मरलेचा एवं जैन समाजाने शुभेच्छा दिल्या.

# संगीत अभ्यासक आणि रसिकांसाठी १० नोव्हेंबरला 'सूर बतियाँ' कार्यक्रम

नगर – संगीत हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आजकाल संगीत शिकण्याकडे सर्वांचा कल दिसून येतो, संगीत शिक्षकही सर्वतोपरी प्रयत्न करून विद्यार्थ्यांना संगीताचे शिक्षण देत आहेत. अनेक जण संगीताच्या विविध परीक्षा देत आहेत. तसेच संगीताच्या विविध स्पर्धांमधे भाग घेत आहेत.

या स्पर्धात्मक वातावरणात संगीताचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे त्यांना सुयोग्य मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने आम्ही संगीत अभ्यासक आणि गायिका सायली पानसे लिखित 'गंधार' या पुस्तकावर आधारित शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, चित्रपट संगीत अशा विविध गीतप्रकारांवर संगीत विषयक गप्पांच्या आणि संगीताच्या माध्यमातून संवाद साधत प्रात्यक्षिकासह माहिती देणारा सूर बतियाँ हा आगळावेगळा कार्यक्रम ज्याची संकल्पना आणि संहिता लेखन स्वतः सायली पानसे यांचे आहे.



सौ. वर्षा पंडित

हा कार्यक्रम श्री गुरूमाऊली संगीत विद्यालय, अहिल्यानगर यांचे वतीने आयोजित करण्यात येत आहे. संगीतसाधक आणि संगीत शिक्षकांसाठी ही खास पर्वणीच आहे. विशेष करून गाणाऱ्या व संगीत शिकणाऱ्या कलाकारांसाठी हा कार्यक्रम अतिशय उपयोगी असणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ मार्गदर्शक आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई चे रजिस्ट्रार विश्वास जाधव तसेच ज्येष्ठ संगीततज्ञ प्रा. रेवण्णाथ भनगडे, ज्येष्ठ संगीत गुरुवर्या श्रीमती कुमुदिनी बोपर्डीकर, संगीतकार व गायक डॉ. निरज करंदीकर, लक्ष्मण डहाळे सर, सुरत येथील संगीत शिक्षक प्रा. तानाजी जाधव, ताथवडे येथील इंदिरा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, कॉलेजचे संगीत विभाग प्रमुख प्रा. निलेश खळीकर यांची उपस्थिती असणार आहे तसेच नगरचे सुफी संगीततज्ञ पवन नाईक, ज्येष्ठ उद्योजक राजेंद्र चोपडा, धनेश बोगावत, अशोक गांधी (जरिवाला) यांचे सह सर्व संगीत विद्यालयांचे संचालक आदींच्या उपस्थितीत हा अभ्यासपूर्ण कार्यक्रम १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६:३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या सन्मानिका प्रत्येक संगीत विद्यालयांमध्ये विशेष सवलतीने उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत तसेच कार्यक्रमाचे दिवशी माऊली सभागृह येथे उपलब्ध असल्याची माहिती गुरूमाऊली संगीत विद्यालयाचे चंद्रकांत पंडित यांनी दिली आहे.

सर्व संगीत विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी व आपली वेळ राखून ठेवावी, असे आवाहन सौ. वर्षा चंद्रकांत पंडित, (संचालिका, श्री गुरुमाऊली संगीत विद्यालय अहिल्यानगर) यांनी केले आहे.

# धार्मिक शिक्षण, आरोग्य व व्यवसाय करण्यासाठी गौतम कलश निधीचे संकलन

### सुनंदाजी म.सा. यांचे प्रतिपादन

जामखेड – गौतम कलश निधीचे संकलन समाजातील शिक्षण, आरोग्य, व्यावसायामध्ये मदत करण्यासाठी योजना उपाध्याय श्री प्रविणऋषीजी म.सा. यांच्या संकल्पनेतून तयार झाले आहे. याचे गावोगावी स्थापना झालेली आहे.





जामखेड जैन स्थानक येथे सुनंदाजी म.सा. आदि ठाणा ६ यांच्या पावन सानिध्यामध्ये गौतम निधी फाऊंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष संदीप बोगावत व कार्यकारणी यांनी गौतम कलश अनुष्ठानचा कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी उपस्थित असलेले जैन बांधव.

४ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता जामखेड जैन स्थानक येथे सुनंदाजी म.सा. आदि ठाणा ६ यांच्या पावन सानिध्यामध्ये गौतम निधी फाऊंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष संदीप बोगावत व कार्यकारणी यांनी गौतम कलश अनुष्ठानचा कार्यक्रम आयोजित केला होता.

यावेळी सुनंदाजी म.सा. बोलताना म्हणाल्या की, गौतम निधी कलश अनुष्ठान व संकलन हा कार्यक्रम समाजातील गरजवंत व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी व समाजातील प्रत्येक व्यक्तीने या गौतम कलश निधीमध्ये दररोज परिवारातील प्रत्येक सदस्याने दान समर्पण करायचे आहे. असे आवाहन सुनंदाजी म.सा यांनी केले.

सकल जैन बांधवांनी सकारात्मक व प्रतिसाद दिला हा कलश नवीन वर्षाच्या सुरुवातीला घरी नेऊन याची स्थापना करावी. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष दिलीप गुगळे, उपाध्यक्ष महावीर बाफना आदी कार्यकारणी सदस्यांचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले. हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अनिल बाफना, पुनम गुंदेचा, संकेत कोठारी, हिम्मत गांधी, सुमित बोरा, साहिल पितळे, केतन चोपडा, आनंद गुगळे, रणजित सुराणा, सुयोग पितळे, श्रेयस बाफना, प्रणव भंडारी, अमोल ताथेड, जितेंद्र बोरा आदींनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन संदीप बोगावत यांनी मानले.

### शिक्षण, आरोग्य, व्यवसायात सहकार्य राहील

सामान्य किंवा श्रीमंत कुटुंब असो, लहान मुलांपासून ते वृद्ध सदस्यांपर्यंत, ते गुप्त दान देण्याच्या भावनेने या कलशात पैसे गोळा करतील. जमा केलेली रक्कम समाजातील सदस्यांना शिक्षण आणि आरोग्यासाठी मदत म्हणून आणि व्याजशिवाय व्यवसाय आणि घरांसाठी कर्जाच्या स्वरूपात दिली जाईल.

### कलश वर्षातून दोनदा उघडली जाईल

गौतम निधी कलशमध्ये दिलेल्या प्रत्येक कुटुंबाकडून देणगी वर्षातून दोनदा आयोजित कार्यक्रमाद्वारे गौतम स्वामींच्या दारात जमा केली जाईल. कोणत्याही कलशाची रक्कम वैयक्तिकरित्या मोजली जाणार नाही. यातून समाजातील गरजू कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, विकास आणि घरबांधणीसाठी धनादेशाद्वारे मदत दिली जाणार आहे.





सावेडीतील बंधन लॉन या ठिकाणी श्री शंकर महिमा ग्रंथाचा प्रकाशन सोहळ्याप्रसंगी श्रीश्री १००८ पीर रामनाथजी महाराज व श्री लेले काका. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित पी. अरुणकुमार, कन्हैय्यालाल शहा, प्रजापती ब्रह्माकुमारी प्रमिलाबेन जाधव आदी.

# श्री शंकर महिमा ग्रंथाचा प्रकाशन सोहळा धार्मिक वातावरणात साजरा

नगर – सदगुरू श्री शंकर महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व गुरूवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री राजाभाऊ) यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेतून मंगल भक्त सेवा मंडळ, ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या माध्यमातुन बालगोपालांसाठी श्री शंकर गीता या ग्रंथावर आधारित सचित्र स्वरूपात मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत श्री शंकर महिमा या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत बंधन लॉन, सावेडी, अहिल्यानगर या ठिकाणी साजरा झाला.

या धार्मिक कार्यक्रमाप्रसंगी श्री श्री १००८ योगी पीर रामनाथजी महाराज, (मठाधीश– अखिल भारतीय नाथ संप्रदाय, मठाधिपती भर्तुहरी गुफा, उज्जैन, मध्यप्रदेश) यांच्या हस्ते व श्री लेले काका (श्री शंकर महाराज भक्त पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली झाला

या कार्यक्रमा प्रसंगी मंचावर उपस्थितीत पी. अरुणकुमार (I. I. S.), उपसंचालक प्रधानमंत्री कार्यालय, नवी दिल्ली, कन्हैयालाल शहा (सह संघचालक, RSS, संभाजीनगर विभाग ), प्रजापती ब्रम्हकुमारी प्रमिलाबेन जाधव (माढा), सुनिल रासने (अध्यक्ष, दगडुशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे), वसंत विटणकर सर (ज्येष्ठ चित्रकार, अहिल्यानगर), विजयनाथ केदारीबाबा (श्री शंकर भक्त अहिल्यानगर), प्रसाद धर्माधिकारी (भाषा अनुवादक, नाशिक ), बाळासाहेब लांडगे (उद्योजक, पुणे) तसेच मंगल भक्त सेवा मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ कोठारी, सौ. मनिषा राजेश कोठारी, उपाध्यक्ष धरमचंद कोठारी इ. होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री शंकर महाराज स्तवनाने करण्यात आली. तदनंतर राजेश कोठारी ते गुरूवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज यांचा दृकश्राव्य स्वरूपातील ३० मिनीटांचा जिवन प्रवास माहितीपट दाखविण्यात आला. तदनंतर पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले तसेच मंचावरील व मंचासमोरील सर्व अतिथीगण यांचा मंगल भक्त सेवा मंडळाच्या सेवेकऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक व अध्यक्षीय निवड मंडळाचे सदस्य आप्पासाहेब सप्रे व अध्यक्षीय सूचनेस मंडळाचे सदस्य दिलीप खोले यांनी अनुमोदन दिले. यावेळी पी अरुणकुमार, कन्हैयालाल शाह, प्रमिलाबेन जाधव, सुनिल रासने, वसंत विटणकर, प्रसाद धर्माधिकारी, विजयनाथ केदारी, धरमचंद कोठारी, सौ मनिषा कोठारी व गुरूवर्य भाऊ यांनी आपले श्री शंकर महिमा या ग्रंथाच्या अनुषंगाने सविस्तर मनोगत व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे आभार व समारोप मंडळाचे कोषाध्यक्ष पवन फिरोदिया यांनी केला.

याप्रसंगी भारतातुन विविध भागातील अनेक ठिकाणांवरून आलेले शंकर भक्त, भाविक– भक्तगण, व देश–विदेशातुन आलेले शंकर भक्त तसेच मंडळाचे सेवेकरी व मंडळाचे सदस्य आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी प्रसाद स्वरूपात सुरूचि भोजनाचा लाभ घेतला. अशा प्रकारे अतिशय थाटामाटात व आनंदोत्सवात श्री शंकर महिमा प्रकाशन सोहळा धार्मिक वातावरणात झाला.

# आज कार्तीक शुध्द अष्टमी सदगुरु शंकर महाराजाचा जन्मदिन

श्री शंकर महाराज जनुकाकांना बुवा म्हणत असत श्री शंकर महाराज बुवांना म्हणायचे बुवा विड्याचे पान दे बुवा खिशात हात घालुन पान द्यायचे. बुवा चुना दे म्हणताच बुवा खिशातुन चुना काढुन देत असत. वास्तविक पाहता श्री जनुकाका खिशात काहीच ठेवत नसत. पण शंकर महाराजांची आज्ञा झाली की खिशात हात घालत असत. ती वस्तु खिश्यातुन बाहेर काढुन देत असत. असाच एक प्रसंग श्री शुभराय मठात बरीच भक्त मंडळी एकदा सायंकाळी जमली होती. श्री शंकर महाराजही होते. महाराज म्हणाले, उद्या शुक्रवार आहे आपण सगळे सकाळी बसने तुळजापुरला आईसाहेबाच्या दर्शनला जावु. भक्त मंडळीस फार आनंद झाला व ठरल्याप्रमाणे पहाटेच्या पहिल्या बसला सर्व भक्तमंडळी बस स्टँडवर जमा झाली. बस लगताच सगळ्यांनी पटकन बस मध्ये घुसुन चांगली सीट गाठण्यासाठी झुंबड उडाली.जनुकाका मात्र सावकाश गर्दी चढल्यानंतर बस मध्ये चढले व त्यांना महाराज कुठे आहे म्हणुन प्रश्न पडला. तेवढ्यात महाराज म्हणाले, अरेबुवा मी येथेच आहे, पुढे माझ्या जवळ ये. वास्तविक पाहता शंकर महाराज अष्टवक्र होते. एवढया गर्दीत महाराज केव्हा चढले व एक नंबर सिटवर जावुन केव्हा बसले कुणालाच कळाले नाही. भक्तमंडळींनी बस पुर्ण भरुन गेली. कंडक्टर बसमध्ये चढला व बस सुरु झाली. महाराज बुवांना म्हणाले, बुवा तु तिकिट काढ. बुवानी कंडक्टरला आपल्याकडे बोलवले व तिकिट देण्यास सांगितले व खिशात हात घालुन पैसे काढले. ती दोन रुपयांची नोट होती. त्यावेळेस भाडे दीड रुपया होते. कंडक्टरला दोन रुपये देताच त्याने एक तिकिट दिले व आठ आणे परत केले. ते बुवांनी खिशात टाकले व परत खिशात हात घालुन पैसे काढले ती दोन रुपयांची नोट निघाली. परत बुवांनी तिकिट मांगितले कंडक्टरनी पुन्हा एक तिकिट दिले व आठ आणे परत केले. ते बुवांनी खिश्यात टाकले. परत खिशात हात घालुन पैसे काढले ते परत दोन रुपया होते. ते कंडक्टरला देताच तो म्हणाला, एकदम सगळे तिकिटा काढा कि. जानु काका म्हणाले, ते जमणार नाही. ही सर्व शंकर महाराजांची लिला आहे. जनुकाका तिकिट काढत गेले व शेवटी तिकिटासांठी खिशात हात घालताच खिसा रिकामा होता व ते कंडक्टरला म्हणाले झाली तिकिटे. कंडक्टरनी माणसे मोजली व तेवढीच तिकिटे दिल्याची त्यांची खात्री झाली अशी शंकर महाराजांची लिला होती. जनुकाका संगीत तज्ञ होते. त्यांच्याकडे संगीत शिकण्यास पण बरीच मंडळी येत असे. एकदा नगरला श्री शंकर महाराजांची भक्त मंडळी डॉ. धनेश्वरांकडे जमली होती. डॉ. धनेश्वर म्हणाले, जनुकाका भारतीय संगीत हे इतके उत्कृष्ट दर्जाचे आहे की त्याचा परिणाम जड वस्तुवर होतो असे आपण ऐकले आहे ते खरे आहे का? जनुकाका हो म्हणाले. डॉ. धनेश्वर म्हणाले, तुम्ही आम्हांला प्रचिती देवु शकता का? जनुकाका म्हणाले, श्री शंकर महाराजांच्या कृपेने काय अशक्य आहे. झाले संध्याकाळी भजनाची सर्व तयारी झाली व जनुकाकांनी रागदारी सुरु केली. संगीत मैफल ऐन रंगात आली असताना दिवाणखान्यात एक गादी गुंडाळी करुन उभी ठेवली होती. ती गादी सुराच्या तालात हलतांना सर्व भक्त मंडळींनी पाहिली. डॉ. धनेश्वरांनी जनुकाकांना नमस्कार केला. जनुकाका म्हणाले, ही सर्व शंकर महाराजांची लिला. आजही सदगुरु शंकर महाराजांची प्रचिती सर्व शंकर भक्तांना येते. आपल्या अहिल्या नगरी शंकर महाराजांना फार आवडायची. अहिल्यानगरमध्ये जती केदारी महाराज हे शंकर महाराजाचे शंकर गिताचे पारायण करुन घेतात. तसेच आदरणीय विश्वेश्वर महाराज उर्फ राजाभाऊ कोठारी यांनी खास लहान मुलासांठी श्री शंकर महिमा हा ग्रंथ उपलब्ध केलेला आहे. अशा अवलियाला कोटी कोटी प्रणाम! जय शंकर!

**– श्रीपाद शरद तांबोळी**

# श्री क्षेत्र वाल्मिकी धाम पीठाधीश्वर तथा सांसद बालयोगी उमेशनाथजी महाराजांचे शहरात स्वागत

## मेहेतर वाल्मिक समाज व सर्व राजकीय पक्षांच्या वतीने सत्कार



श्री क्षेत्र वाल्मिकी धाम पीठाधीश्वर तथा सांसद बालयोगी उमेशनाथ महाराजांचे मेहेतर वाल्मिक समाज व राजकिय पक्षांच्यावतीने शहरात स्वागत करण्यात आले.

नगर – शहरात श्री क्षेत्र वाल्मिकी धाम पीठाधीश्वर तथा उज्ज्ञैन राज्यसभेचे सांसद बालयोगी उमेशनाथजी महाराज यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. लालटाकी येथील गोगादेव मंदिर परिसरात त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. मेहेतर वाल्मिक समाज व सर्व राजकीय पक्षांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

उमेशनाथजी महाराज यांच्या हस्ते गोगादेव मंदिरात आरती करण्यात आली. तर खाकीदास बाबा मठ येथे झालेल्या कार्यक्रमात मेहेतर वाल्मिक समाज पंचचे अध्यक्ष दिपक बाबू चव्हाण, सदस्य विजय छजलाणी, प्रदीप चव्हाण, बाबूराव वाणे, ॲड. अभिजीत पुप्पाल यांनी उमेशनाथजी महाराज यांचा सत्कार करण्यात आला. खासदार निलेश लंके व अभिषेक कळमकर यांनी उमेशनाथजी महाराज यांचे दर्शन घेऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी काँग्रेसचे दीप चव्हाण, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, सुरेखा विद्ये, माजी नगरसेवक संजय घुले, दादाभाऊ कळमकर, महेंद्र गंधे, सचिन पारखी, संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, बाबासाहेब सानप, बाबासाहेब वाकळे, सीए राजेंद्र काळे, राजेंद्र गांधी, संजय चोपडा, ब्रिजलाल सारडा उपस्थित होते.

भिंगार येथील भगवान वीर गोगादेव मंदिरसाठी छावणी परिषदेची जागा समाजाला ९९ वर्षाच्या करारावर मिळावी, यासाठी केंद्र शासनाकडे प्रयत्न करुन ती जागा समाजाला मिळवून देण्याच्या मागणीचे व मेहेतर वाल्मिक समाजाच्या विविध प्रश्नांचे निवेदन उमेशनाथजी महाराज यांना भिंगारचे सुमित नकवाल, सोनू गोहेर, धुलिया यांनी दिले.

बालयोगी उमेशनाथजी महाराज भाविकांशी संवाद साधताना म्हणाले की, अध्यात्मातून समाजाला दिशा देताना राजकारणातून समाजाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. निस्वार्थ भावनेने समाजकार्य सुरु आहे. प्रत्येक मनुष्यापुढे संकटे उभे असतात, मात्र जो व्यक्ती त्यावर मात करण्याची धडपड करतात ईश्वर त्यांना त्या संकटातून बाहेर काढण्यास मदत करत असल्याचे त्यांनी सांगितले. तर माणुसकी व भाईचाराचा संदेश देऊन समाजाच्या विकासासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन संजय चव्हाण यांनी केले. आभार भाजपचे मागासवर्गीय सेलचे अध्यक्ष नरेश चव्हाण यांनी मानले.



माळीवाडा पंचमंडळ ट्रस्ट व श्री संकटमोचन विजय हनुमान सेवा मंडल यांच्या वतीने माळीवाडा येथील श्री शनिमारुती मंदिर येथे ५६ भोग अन्नकोट उत्सव सर्व भाविक, भक्तगणांच्या उत्साहात झाला.

## माळीवाडा पंचमंडळ ट्रस्ट व श्री संकटमोचन विजय हनुमान सेवा मंडळाच्यावतीने शनिमारुती मंदिरात ५६ भोग अन्नकोट उत्साहात

नगर – माळीवाडा पंचमंडळ ट्रस्ट व श्री संकटमोचन विजय हनुमान सेवा मंडल यांच्या वतीने माळीवाडा येथील श्री शनिमारुती मंदिर येथे ५६ भोग अन्नकोट उत्सव सर्व भाविक, भक्तगणांच्या उत्साहात झाला. यावेळी ५६ प्रकारचे अन्नपदार्थ नैवेद्य म्हणून ठेवण्यात आले होते.

मंदिराचा गाभारा सुंदर तर दिसे, त्याबरोबरच मंदिरात मंद सुगंध दरवळत होता. मंदिरात रंगीबेरंगी दिवे प्रकाशित होते. उत्सवाला भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पुजा, आरती, भक्तीभावाने झाली. हनुमान देवतेचा श्रद्धेने जय..जयकार करीत भाविकांनी आनंद व्यक्त केला.

याठिकाणी मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत हेडा यांनी सांगितले की, दर मंगळवारी आम्ही हनुमान चालिसा पाठ व भजन संध्या कार्यक्रम माळीवाडा येथील शनिमारुती मंदिरात आयोजन करत असतो. यासाठी आमचे सर्व सहकारी सहभागी होऊन मोठ्या भक्तीभावाने हा उत्सव आम्ही साजरा करतो.

यावेळी देवस्थानच्या वतीने उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, गजानन ससाणे, रंगनाथ फुलसौंदर, गणेश राऊत, बाबु कचरे, मारुती मंदिराचे पुजारी अनंत पांडे आदींनी परिश्रम घेतले.

## शनिवारी महफिले मुशायराचे आयोजन

नगर – स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त मखदूम सोसायटी व मराठा सेवा संघातर्फे कौमी एकता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये या सप्ताहाची सुरवात डॉ अल्लामा इकबाल यांच्या जयंती राष्ट्रीय उर्दु दिन पासून अलकलम ॲकॅडमी लखनौच्या संयुक्त विद्यमाने महफिले मुशायऱ्याने ९ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान हॉल येथे महफिले मुशायराचे आयोजन करण्यात आले असल्याचे मख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी सांगितले.

या मुशायरामध्ये डॉ. नईम अख्तर, नोअमान गोरखपुरी, मुसैब आजमी, सोनु रोहित, विनित शंकर, व अहमदनगर येथील बिलाल अहमदनगरी, सय्यद खलील, आसिफ सर, मुन्नवर हुसेन हे आपले कविता सादर करणार असल्याचे मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या सचिव डॉ. कमर सुरूर यांनी सांगितले. या मुशायरे कार्यक्रमास शौकत तांबोली, प्रा.डॉ. अब्दुस सलाम सर, प्रिन्सिपल खालीद जहागिरदार, शरफुद्दीन सर, इंजि. इकबाल सय्यद, अयाज गफुर, तन्वीर चष्मावाला, सहेली ग्रुप, हमजा अली आदिंचे सहकार्य लाभले आहे.

या साहित्यिक मेजवानी मुशायऱ्याच्या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित रहावे. प्रवेश विनामूल्य असल्याचे मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद खलील व सचिव निसार बागवान यांनी आवाहन केले आहे.

# जात, पंथ, प्रांत, वर्ण, भाषा यात विभागण्याआधी मी हिंदू आहे याचे भान ठेवा

### राष्ट्रसंत आचार्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांचे प्रतिपादन; शिव चैतन्य जागरण यात्रा अंतर्गत दर्शन सोहळा आणि मार्गदर्शन, संत संदेश कार्यक्रमास प्रतिसाद




शिवचैतन्य जागरण यात्रा अंतर्गत राष्ट्रसंत आचार्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज (कोषाध्यक्ष, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट, अयोध्या उपाध्यक्ष, श्री कृष्णजन्मभूमी, मथुरा) यांचा दर्शन सोहळयाप्रसंगी मार्गदर्शन केले. यावेळी ह.भ.प. बबनमहाराज बहिरवाल (श्रीसंत मदन महाराज संस्थान, कडा), विद्याभूषण मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज, मोहनबुवा रामदासी आदी. (छाया –उदय जोशी)

नगर – आजवरचा इतिहास पाहिला तर केवळ कपट व कारस्थानाने हिंदूंचे साम्राज्य संपवण्याचा प्रयत्न देशी व विदेशी ताकदींनी वेळोवेळी केला व तो काही अंशी यशस्वी झाला. आज असेच संकट परकीय व स्वकीयांकडून हिंदूंसमोर उभे केले आहे. परस्परातील फुटीमुळे या कपट कारस्थानांना आम्ही आज बळी पडलो तर भारताचा बांग्लादेश व्हायला वेळ लागणार नाही म्हणून जात, पंथ, प्रांत, वर्ण, भाषा यात विभागण्या आधी मी हिंदू आहे याचे भान ठेवा असे आवाहन राष्ट्रसंत आचार्य गोविंददेव गिरी यांनी केले.

शिवचैतन्य जागरण यात्रा अंतर्गत राष्ट्रसंत आचार्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज (कोषाध्यक्ष, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट, अयोध्या उपाध्यक्ष, श्री कृष्णजन्मभूमी, मथुरा) यांचा दर्शन सोहळा आणि मार्गदर्शन सभा व संत संदेश सायंकाळी टिळक रोड नंदनवन लॉन्स येथे झाला. यावेळी ह. भ. प. बबनमहाराज बहिरवाल (श्रीसंत मदन महाराज संस्थान, कडा), विद्याभूषण मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज, मोहनबुवा रामदासी उपस्थित होते.

स्वामी गोविंददेव गिरी महाराज पुढे म्हणाले शिवरायकडे पाहून अनेक स्वातंत्र्यसेनानी, योध्दे, राजे तयार झाले आहेत छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे जीवनचरीत्र अनेकाना प्रेरणादायी राहिले आहे. त्यांची प्रेरणा आज प्रत्येकाने घेतली पाहीजे राष्ट्र घडविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्याम ुळे मतदान हे पवित्र राष्ट्रीय कर्तव्य आहे. सर्वांनी कर्तव्य जाणीवपूर्वक पूर्ण करावे. १००% मतदान होईल हा सर्वांचा प्रयत्न असावा. रामदेवरायांचे विजयनगरचे साम्राज्य हा हिंदू साम्राज्याच्या इतिहासातील दैदिप्यमान क्षण होता त्या काळचा तो एकमेव हिंदू राजाला मुघलांनी कपटाने ठार केले व तेथून हिंदुस्तानच्या अंधकारमय युगाला प्रारंभ झाला. मंदारबुवा रामदासी, मोहनबुवा रामदासी, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पुरूष व महिला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून संत दर्शन व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

# मतदार अक्कलमारी शून्यावर आणण्यासाठी १० नोव्हेंबरला नागरिकांचा होणार शपथविधी

### पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेची लोकजागृतीसाठी चळवळ



नगर – शहरातील सावेडी बस स्थानकाच्या जागेतून मतदार अक्कलमारी शून्यावर आणण्यासाठी १० नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता नागरिकांचा जाहीर शपथविधी होणार आहे. गेली ५० वर्षे देशात मतदार अक्कलमारीतून सत्तापेंढारी आणि गुन्हेगारांच्या मागच्या दाराने सत्ता मिळवण्याच्या तंत्राला सुरुंग लावण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेची चळवळ असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

सध्याच्या महाराष्ट्रातील सार्वजनिक विधानसभा निवडणुकीमध्ये तमाम मतदारांनी ऑपरेशन डिच्चू कावा व डिच्चू फत्तेची अंमलबजावणी करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद प्रयत्नशील आहे. देशाला स्वातंत्र्य दीडशे वर्षाच्या लढ्यानंतर मिळाले, परंतु त्यासाठी लाखो लोकांना हुतात्मे व्हावे लागले, स्वतंत्र्योत्तर भारतात लोकशाही तत्वप्रणाली आणि सन १९५२ पासून निवडणुका सुरू झाल्या, परंतु गेल्या ५० वर्षात देशभरात सत्तामारी, टक्केवारी व फ्लेक्स दारोदारी यातून मिळवलेल्या काळ्या पैशाचा वापर मतदार अक्कलमारी करण्यासाठी सर्रास सुरू आहे. अण्णा हजारे यांनी वीस वर्षांपूर्वी जाहीर रीतीने स्पष्ट केले होते, की निवडणुकीमध्ये मी फॉर्म भरला तर डिपॉझिट देखील जप्त होईल, मतदार हे पाचशे रुपये देणाऱ्यांच्या मागे जातात यातून भारतातील लोकशाहीला झालेला कॅन्सर सर्वांनी मान्य केला असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी डिच्चू कावा आणि डिच्चू फत्ते तंत्राचा वापर स्वराज्य उभे करण्यासाठी केला. महात्मा गांधीजींनी इंग्रजांच्या विरुद्ध सन १९४२ मध्ये आझाद मैदानावरून चले जाव! ची घोषणा दिली होती. त्यातून क्रांती झाली. आज नगरसह सर्वच शहरांमध्ये रस्त्यांना खड्डेच खड्डे आहेत, दारिद्र वाढत आहे, झोपडपट्ट्या वाढत आहेत आणि आया–बहिणींना अशा झोपडपट्ट्यांमधून नालीच्या कडेला उघड्यावर आंघोळ करावी लागते.

देशात गुन्हेगारी वाढली आहे. भ्रष्टाचार आणि सार्वजनिक जीवन संपुष्टात येत आहे. या सर्व गोष्टींच्या मागे फक्त एकच बाब आहे, ती म्हणजे मतदार अक्कलमारी. मतदार स्वार्थासाठी मतकोंबाड होतात, जाती धर्माच्या नावावर मतदान करतात. परंतु सत्तापेंढारी वेगवेगळ्या तंत्राचा वापर करून मतदार अक्कलमारी यशस्वी करतात.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर तरी मतदारांनी आणि नागरिकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी संपूर्ण देशाला बळी देत आहेत, आर्थिक स्वातंत्र्यापासून तमाम जनतेला वंचित करत आहोत, या बाबी लक्षात घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मतदार अक्कलमारी विरुद्ध लोकब्रह्मास्त्र संघटनेने ऑपरेशन डिच्चू कावा आणि डिच्चू फत्ते या स्वरुपात मतदारांच्या हाती दिले असल्याचे म्हंटले आहे.

मतदारांनी आपल्या भावी पिढ्यांचा विचार केला पाहिजे. अन्यथा अक्कलमारीमध्ये बळी पडणारे मतदार आणि नागरिकसुद्धा देशद्रोही ठरल्याशिवाय राहणार नाही. आज महाराष्ट्रात येन केन प्रकारे मतदारांना जाळ्यामध्ये पकडण्यासाठी सर्वच पक्ष आणि सत्तापेंढारी प्रयत्नशील आहेत. परंतु मतदारांनी हा देश महाशक्ती होण्यासाठी लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती असणाऱ्या उमेदवारांनाच मतदान केले पाहिजे. अन्यथा देशाची गेली ५० वर्षे वाया गेली तसेच पुढच्या पिढ्या देखील आर्थिक न्यायापासून वंचित राहतील. त्यामुळे लोकजागृतीच्या उद्देशाने अक्कलमारी शून्यावर आणण्यासाठी नागरिकांचा जाहीर शपथविधी होणार असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

या चळवळीसाठी ॲड. गवळी, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे, अशोक भोसले, वीर बहादूर प्रजापती, कैलास पठारे, सुधीर भद्रे, विठ्ठल सुरम आदी प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्यावतीने 'चला करू मतदान' काव्य स्पर्धेचे आयोजन

### स्पर्धकांनी स्वतःच्या मातृभाषेत कविता पाठवण्याचे आवाहन




नगर – महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० % मतदानाची भूमिका बजवावी त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी सिद्धाराम सालीमठ, (जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अहिल्यानगर) यांच्या निर्देशानुसार अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने चला करू मतदान या काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

एखादे गाव, शहर, वसाहत यामध्ये बहुभाषी लोक राहतात. विविधतेत एकता दाखवत लोकशाहीमध्ये भाषा माणसं जोडण्याचे महत्त्वाचं काम करते. स्वतःच्या मातृभाषेत देखील लोक आपल्या भावना व्यक्त करतात. जिल्हा स्वीप समितीने विविध भाषांमधील कवी, गीतकार यांना चला करू मतदान या विषयावरील काव्य स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

काव्यलेखन, काव्यगायन व काव्यवाचन अशापैकी एका स्वरूपात कविता स्वरचित असावी, कुठल्याही राजकीय घटकाचा उल्लेख कवितेमध्ये नसावा. १) अहिल्यानगरकरांनो, तुम्ही लोकशाहीची पणती हाती धरा, विधानसभेच्या निवडणुकीत जरूर मतदान करा. २) आपले मतदान २० नोव्हेंबर रोजी आहे. कृपया विसरू नका. ३) अहिल्यानगरीच्या मतदार राजा जागा हो – २० नोव्हेंबर रोजी लोकशाहीचा धागा हो. यासारख्या संदेशांचा वापर कवितेत करता येईल. कवींनी आपल्या कविता १५ नोव्हेंबर पर्यंत देशातील पहिल्या अहिल्यानगर स्वीप केअर व्हाट्सअप क्रमांक असलेल्या ९००२१०९००३ या क्रमांकावर संपूर्ण नाव व पूर्ण पत्त्यासह पाठवायचे आहेत. कवितेतून मतदार जनजागृतीचा उत्कृष्ट संदेश देणाऱ्या कवितांना पारितोषिकेव सादरीकरणाची संधी देण्यात येणार असून सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र वितरित केले जाणार आहे.

उपक्रमासाठी राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), बाळासाहेब बुगे (शिक्षणाधिकारी–योजना), आकाश दरेकर (उपशिक्षणाधिकारी), मीना शिवगुंडे (उपशिक्षणाधिकारी), जयश्री कार्ले (विस्तार अधिकारी), डॉ. अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

## १९ वर्षाखालील जिल्हा क्रिकेट निवड चाचणी ९ व १० नोव्हेंबर रोजी होणार

नगर – महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून होणाऱ्या १९ वर्षाखालील अहमदनगर जिल्हा क्रिकेट निवड चाचणी ९ आणि १० नोव्हेंबर रोजी ९ नोव्हेंबर ग्रामीण भागातील खेळाडू यांची राहिल. वेळ सकाळी ७:३० वाजता ते ९:३० वाजेपर्यंत राहील.

सोबत आधार झेरॉक्स, बर्थ सर्टिफिकेट झेरॉक्स स्टेपल करुन त्यावर मोबाईल नंबर लिहुन द्यावे. यासाठी वयाची अट १/ ९ / २००६ नंतरची जन्म तारीख ग्राह्य धरली जाईल. तसेच १० नोव्हेंबर रोजी शहरातील खेळाडू साठी निवड चाचणी राहिल. वेळ सकाळी ७: ३० ते ९: ३० वाजेपर्यंत राहील. यासाठी वयाची अट ०१ / ०९ / २००६ नंतरची जन्म तारीख ग्राह्य धरली जाईल.

सोबत आधार झेरॉक्स बर्थ सर्टिफिकेट झेरॉक्स स्टेपल करुन त्यावर मोबाईल नंबर लिहून द्यावे. ज्या खेळाडूचे वय १५ वर्षे पूर्ण झाली आहेत अश्याच खेळाडूंना प्रवेश दिला जाईल. सर्व झेरॉक्स सोबत आणणे. विसरलो ही सबब चालणार नाही रजिस्ट्रेशन फी २०० राहील.

ठिकाण वाडीया मैदान, बॅडमिंटन हॉंल शेजारी, अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशन अकादमीच्या मैदानावर निवड चाचणी होईल. जिल्ह्यातील खेळाडूंनी या निवड चाचणीसाठी वेळेवर उपस्थित रहावे, माजी आमदार अरूण जगताप (जिल्हा क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष) यांनी सांगितले.

# संमेलनातून कुटूंबाबरोबरच समाज जोडला जातो

### शाम भुतडा यांचे प्रतिपादन; माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने 'रामा–सामा' स्नेहसंमेलनात दिनदर्शिकेचे प्रकाशन




माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने दिपावलीनिमित्त 'रामा–सामा' स्नेहसंमेलनात माहेश्वरी दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

नगर – आजच्या धावपळीच्या युगात कुटूंबाला वेळ देणे अवघड होत आहे, अशा परिस्थिती स्नेहसंमेलनानिमित्त संपूर्ण समाजाला एकत्र करण्याचा उपक्रम हा कौतुकास्पद असाच आहे. यानिमित्त जुन्या–नव्या पिढींच्या विचारांची देवाण–घेवाण होते. त्यामुळे असे संमेलन होणे गरजेचे आहे. माहेश्वरी युवा संघटना नेहमीच समाज जोडण्यासाठी विविध उपक्रम राबवत असते. त्या माध्यमातून गरजूंना मदत तर गुणवंतांना प्रोत्साहन मिळते. अशा संमेलनातून कुटूंबाबरोबरच समाज जोडला जात आहे. यातून एक चांगला समाज निर्माण होण्यास मदत होते. समाजोन्नत्तीचे हे काम सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. संघटनेच्या माध्यमातून युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच घटकांचा विचार करुन त्यांच्या उन्नत्तीसाठी राबविण्यात येत असलेले उपक्रमातून आदर्श समाज घडेल, असे प्रतिपादन माहेश्वरी युवा संघटनेचे अध्यक्ष शाम भुतडा यांनी केले.

माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने दिपावलीनिमित्त 'रामा–सामा' स्नेहसंमेलनात माहेश्वरी दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष शाम भुतडा, संकेत मानधने, सीए अनिकेत बलदवा, पियुष झंवर, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, गोविंद दरक, पवन बंग, प्रतिक सारडा, भुषण काबरा, कुणाल लोया, शेखर असावा, प्रणव बिहाणी, संग्राम सारडा, योगेश सोमाणी, अभिनंदन कालानी, संकेत अट्टल, गोविंदा काकानी, पवन बिहाणी, मुकूंद जाखोटीया, अमित खटोड आदि उपस्थित होते.

प्रास्ताविकात सीए अनिकेत बलदवा म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकांचा विकास व्हावा, त्यांच्या अडी–अडचणी दूर व्हाव्यात. यासाठी विविध उपक्रम राबविले जात असतात. त्याचप्रमाणे गुणवंतांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन दिले जाते. यासाठी समाजातील ज्येष्ठ व मान्यवरांचे मोठे सहकार्य मिळत असल्याने आम्हा युवकांना काम करण्यास प्रोत्साहन मिळते. दिवाळीनिमित्त रामा–सामा स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून सर्व समाज एक कुटूंब म्हणून एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच युवक – विद्यार्थी यांचे संघटन हाती घेण्यात आला असून, पर्सनालिटी डेव्हलमेंट, स्कील डेव्हलमेंट यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन मार्गदर्शन केले जात असल्याचे सांगितले.

प्रकल्प प्रमुख सीए अनिकेत बलदवा, पियुष झंवर यांनी काम पाहिले. यावेळी हनुमान चालिसा पठणनाने सुरुवात होऊन मान्यवरांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर आरती करण्यात आली. सूत्रसंचालन व आभार सचिव संकेत मानधने यांनी मानले. यावेळी समाज बंधू–भगिनी उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता





## वार्धक्य रोखायचंय ?

वार्धक्य रोखण्याबाबत सतत नवनवे संशोधन होत असते. आहारातील बदलही यासाठी उपयुक्त ठरत असतात. कमी कर्बोदके व कमी उष्मांक असलेला आहार हा वार्धक्याच्या प्रक्रियेचा वेग कमी करतो. कारण त्यात विशिष्ट प्रकारचे संयुग असते, असे वैज्ञानिकांचे मत आहे. ग्लॅडस्टोन प्रयोगशाळेतील संशोधक एरिक वेर्दिन यांनी सांगितले की, मानवी शरीरातील एक संयुग हे वार्धक्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडत असते.

वयाशी निगडित असलेले हृदयरोग, अल्झायमर व कर्करोगाचे काही प्रकार हे आजार रोखण्यासाठी त्यामुळे नवीन औषधे तयार करता येऊ शकतात. बिटा हायड्रॉक्सिब्युटायरेट (बिटा–ओएचबी) या संयुगाची भूमिका वैज्ञानिकांनी तपासली असून ते आपल्या शरीरातील एक केटोन आहे. त्याची निर्मिती प्रदीर्घ काळ कमी उष्मांकाचा आहार किंवा केटोजेनिक आहारामुळे या संयुगाची निर्मिती मानवी शरीरात होत असते. केटोन गटातील संयुगे ही काही वेळा अतिमात्रेत असतील तर विषारीही सिद्ध होत असतात ती टाईप १ मधुमेह असलेल्या रुग्णाच्या शरीरात ती आढळतात. ऑक्सिडीकरणामुळे येणारा ताण हा काही रेणू विषारी पातळीपर्यंत वाढल्याने निर्माण होतो, त्यामुळे वार्धक्याची क्रिया वाढत जाते. बिटा–ओएचबी हा शरीरातील ऊर्जेचा प्रमुख स्रोत काही विकारांना रोखतो जी ऑक्सिडेशनमुळे ताण निर्माण करीत असतात. ताण रोखल्याने यात पेशींपासूनच वार्धक्याची क्रिया रोखली जाते. पेशी जेव्हा ऊर्जेसाठी ऑक्सिजन वापरतात तेव्हा ऑक्सिडीकरणाने ताण येतो व परिमाम शरीरात विषारी रेणू सोडले जातात त्यांनाच आपण फ्री रॅडिकल्स किंवा मुक्त कण असे म्हणतो. पेशी वार्धक्याकडे झुकतात तसे मुक्त कणांची निर्मिती रोखण्याची त्यांची क्षमता कमी होत जाते. पेशी खराब होतात. ऑक्सिडेशनमुळे ताण वाढतो व वार्धक्य आणखी वेगाने तुमचा पाठलाग करते. बिटा–ओएचबीमुळे या प्रक्रियेला अटकाव होतो. वैज्ञानिकांच्या मते बिटा–ओएचबी निर्मितीमुळे हिस्टोन डिॲसेटिलाइजेस किंवा एचडीएसी या वितंचकाचे कार्य रोखले जाते. एचडीएसीमुळे फॉक्सो ३ ए व एमटी २ या जनुकांची जोडी स्वीच ऑफ केली जाते पण बिटा–ओएचबीमुळे एचडीएसीला तसे करण्यापासून रोखले जाते परिणामी ही दोन्ही जनुके कार्यान्वित राहतात त्याचा परिणाम म्हणून पेशी ऑक्सिडेशनने निर्माण होणाऱ्या चाणाला रोखण्याची प्रक्रिया सुरू करतात.

## ब्रह्मांडातील सर्वात जुना तारा

ब्रह्मांडातील आतापर्यंतचा सर्वात जुना तारा ऑस्ट्रेलियाच्या वैज्ञानिकांनी शोधला असून तो महाविस्फोटानंतर अर्थात बिग बँग नंतर काही काळातच म्हणजे १३.७ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेला आहे. हा तारा पृथ्वीपासून ६००० प्रकाशवर्षे दूर असून त्यामुळे वैज्ञानिकांना प्राथमिक ताऱ्यांची रासायनिक रचना अभ्यासण्याची संधी मिळाली आहे, तसेच विश्वाचे बालपण कसे होते यावरही प्रकाश पडणार आहे. द ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी रीसर्च स्कूल ऑफ अॅस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स या संस्थेचे प्रमुख संशोधक स्टीफन केलर यांनी सांगितले की, पहिल्या ताऱ्याची रासायनिक रचना आता आम्हाला सापडली आहे व तो ताराही सापडला आहे.




विश्वाच्या निर्मितीनंतर पहिले तारे कसे होते याची कल्पनाही त्यातून येईल. एएनयू स्कायमॅपर या सायडिंग स्प्रिंग ऑब्झर्वेटरीच्या मदतीने हा तारा शोधून काढण्यात आला असून पाच वर्षांच्या प्रकल्पात दक्षिण आकाशाचा नकाशा तयार करण्यात आला व त्यात प्राचीन तारे शोधण्याचा हेतू होता. गवताच्या गंजीत सुई शोधण्याचा हा प्रकार केवळ या दुर्बिणीच्या मदतीने शक्य झाला, असेही केलर म्हणाले. केलर व त्यांच्या सहकाऱ्यांनी या ताऱ्याच्या शोधाची खातरजमा चिली येथील मॅगेलान दुर्बिणीच्या मदतीनेही केली आहे. या नवीन ताऱ्याची रासायनिक रचना वेगळी असून, त्याचे वस्तुमान सूर्याच्या ६० पट आहे. आपल्या सूर्यासारखा तारा तयार होण्यासाठी हायड्रोजन व हेलियम यांची गरज असते. महाविस्फोटातून ती पूर्ण झाली व त्यात काही प्रमाणात लोह मिसळले गेले. त्याचे प्रमाण पृथ्वीच्या वस्तुमानाच्या एक हजार पट असते. आता जो प्राचीन तारा सापडला आहे, त्यात ऑस्ट्रेलियाच्या आकाराच्या लघुग्रहाइतके लोह असावे व कार्बनही असावा. त्यामुळे पहिले तारे कसे होते व त्यांचा मृत्यू कसा होत असे यावर त्यामुळे प्रकाश पडणार आहे. विश्व निर्मितीच्या सुरुवातीला निर्माण झालेल्या ताऱ्यांचा मोठ्या विस्फोटांनी मृत्यू होतो व त्यामुळे अवकाशात लोहाचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात पसरते, असा आतापर्यंतचा समज होता. पण तो खोटा ठरला आहे. आता सापडलेल्या प्राचीन ताऱ्याच्या निरीक्षणावरून त्या ताऱ्यांच्या मृत्यूनंतर निर्माण होणाऱ्या प्रदूषणात कार्बन व मॅग्नेशियम या हलक्या मूलद्रव्यांचा समावेश आहे.

याचाच अर्थ त्या वेळी ताऱ्यांच्या स्फोटात कमी ऊर्जा बाहेर पडत होती व लोहासारखी जड मूलद्रव्ये ही कृष्णविवरे गिळंकृत करीत असत. ही कृष्णविवरे स्फोटाच्या केंद्रस्थानी तयार होत असत, असे केलर यांनी सांगितले. जर्नल नेचर या नियत कालिकात हा शोधनिबंध प्रसिद्ध झालेला आहे.

## कृत्रिम अस्थिमज्जेची निर्मिती

स्टेमसेल्स म्हणजेच मूळपेशी किंवा स्कंदपेशी या अशा पेशी असतात ज्यांचे रूपांतर कोणत्याही अवयवाच्या पेशींमध्ये करता येऊ शकते. जर्मन वैज्ञानिकांनी कृत्रिम अस्थिमज्जेची निर्मिती केली असून त्याच्या मदतीने अशा मूळपेशींची संख्या वाढवता येते. परिणामी त्याचा उपयोग रक्ताचा कर्करोग (ल्यूकेमिया) बरा करण्यासाठी होऊ शकतो. ही कृत्रिम अस्थिमज्ञा म्हणजे एक सच्छिद्र घटक असून त्यात नैसर्गिक अस्थिमज्जेचे (मगज) गुणधर्म आहेत व त्याचा वापर प्रयोगशाळेत मूळपेशी वाढवण्यासाठी करता येणार आहे. संशोधकांच्या मते कालांतराने रक्ताचा कर्करोग बरा करण्यासाठी या कृत्रिम अस्थिमज्जेचा उपयोग होईल.




कार्लश्रु हे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅक्स प्लांक इन्स्टिट्यूट फॉर इंटेलिजंट सिस्टीम्स, स्टुटगार्ट व तुबीगेन युनिव्हर्सिटी या तीन संस्थांनी या कृत्रिम अस्थिमज्जेची निर्मिती केली असून त्यात मूळपेशींची संख्या वाढत जाते. एरिथ्रोसाईटस्? किंवा प्रतिरक्षा पेशी सारख्या रक्तातील पेशींचा पुरवाठा हेमाटोपोइटिक मूळ पेशींकडून केला जात असतो व हेमाटोपोइटिक मूळ पेशी अस्थिमज्ञेत तयार होत असतात. त्यांचे कार्य बिघडले तर रक्त विकार होतात.

हेमाटोपोइटिक मूळ पेशी या रक्ताच्या कर्करोगावर उपचारासाठी वापरता येऊ शकतात. रक्ताचा कर्करोग झालेल्या व्यक्तीत बाधित पेशींच्या जागी आरोग्यवान व्यक्तीच्या हेमाटोपोइटिक मूळ पेशी वापरल्या जातात. अर्थात त्यासाठी योग्य दाता मिळणे आवश्यक असते. सध्या तरी या पेशी त्यांच्या नैसर्गिक पर्यावरणात त्यांचे गुणधर्म पाळतात. या प्रश्नावर उत्तर म्हणून वैज्ञानिकांनी नैसर्गिक अस्थिमज्ञेचे गुणधर्म प्रयोगशाळेत निर्माण करता येतात. कृत्रिम बहुलक तयार करणाऱ्या वैज्ञानिकांनी हाडाच्या आकारासारखी स्पंजासारखी एक रचना तयार केली त्यात रक्तनिर्मिती करणाऱ्या अस्थिमज्ञेची नक्कल केलेली आहे. त्यांनी त्यासाठी अस्थिमज्ञेत असतात तसेच मॅट्रिक्स प्रथिनांच्या मदतीने तयार केले. नाळेच्या रक्तातील मूळ पेशी या कृत्रिम अस्थिमज्ञेत आणल्या असतात. त्यांची संख्या काही दिवसात वाढल्याचे दिसून आले. याचाच अर्थ कृत्रिम अस्थिमज्ञेत मूळ पेशींची पुनर्निर्मिती झाली.

## जगावेगळ्या चोराची कहाणी


अनेक चोरीच्या घटना आपण ऐकल्या असतील. कोणी बँक लुटली, कोणी एटीएम फोडले, घरातील तिजोरीतून सगळे दागिने लंपास केले. यांसारख्या अनेक घटनांचा सर्वसाधारणपणे यात समावेश असतो; पण असाही चोर असू शकतो का, जो घरात घुसतो, जेवून घेतो, साफसफाई करतो अन् चोरी न करताच पसारही होतो? थोडेसे आश्चर्य वाटेल; पण अमेरिकेत असाच काहीसा अजब किस्सा घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही अमेरिकेच्या वॉशिंगटनमध्ये घडली आहे. येथे एका चोराने असे काही केले आहे की, ते पाहून अनेक जण हैराण झाले आहेत. हा चोर कोणत्याही प्रकारची चोरी करत नाही, तर चक्क लोकांच्या घरात जाऊन राहतो. घराची साफसफाई करतो. टिव्ही बघतो, जेवण बनवून खातो. विशेष म्हणजे जेवल्यानंतर तो भांडी देखील धुऊन ठेवतो. आश्चर्याची बाब म्हणजे हा चोर घरातील काहीही चीजवस्तू लंपास; मात्र करत नाही.

व्यक्तीचे विचित्र वर्तन



माहितीनुसार एका व्यक्तीने सांगितले की, चोराने किचनची खिडकी तोडून घरात प्रवेश केला. त्याने स्वयंपाकघर वापरले आणि स्वतः साठी स्वयंपाक केला. भांडी साफ करून अंघोळ केली. एवढेच नाही, तर विखुरलेले कपडे व्यवस्थित करून ठेवले. यानंतर तो माणूस काहीही न चोरता तेथून पळून गेला. जाण्यापूर्वी त्याने एक चिठ्ठी टाकली. जी चिठ्ठी वाचून घराचा मालकही हैराण झाला. मी सकाळी घरी पोहोचलो तेव्हा स्वयंपाकघरात एक चिठ्ठी पडलेली दिसली. त्या चिठ्ठीत लिहिले होते, मला अन्नाची नितांत गरज होती. मी तुमच्या घरात शिरलो. जेवलो, अंघोळ केली, मला माफ करा. मालकाने पुढे सांगितले की, मनोरंजक गोष्ट म्हणजे त्याने भांडीदेखील धुतलेली होती, त्यामुळे मला वाटते की, तो एक चांगला बदमाश होता. इतकंच नाही, तर रात्री झोपून त्याने ब्लॅकेटची घडी घालूनदेखील ठेवली होती. मी ती चिठ्ठी वाचल्यावर काय करू ते कळत नव्हते. पोलिसांना याबद्दल कळवायचे का, कळवायचे तर त्यांना काय सांगायचे, हादेखील माझ्यासमोर एक प्रश्नच आहे, असे या घरमालकाने म्हटले आहे.

## उडत्या तबकड्यांचे गूढ उकलणार?




अमेरिकेमध्ये सध्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. या वेळेस डोनाल्ड ट्रम्प विरुद्ध कमला हॅरिस अशी लढत पाहायला मिळणार असून दोन्ही उमेदवार सध्या मुलाखती देताना दिसत आहेत. एका मुलाखतीत त्यांनी म्हटले की, आपण राष्ट्राध्यक्षपदी निवडून आलो तर 'युफो' म्हणजेच उडत्या तबकड्यांचे व्हिडीओ सार्वजनिक करण्याच्या धोरणास पाठिंबा देऊ!

ट्रम्प हे सोशल मीडियावर लोकप्रिय असलेल्या लोकांना मुलाखती देत आहेत. त्यांनी काही आठवड्यांपूर्वी जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि एक्सचे (आधीचं ट्विटर) प्रमुख एलन मस्क यांना मुलाखत दिली. नुकतीच त्यांनी पॉडकास्टर लेक्स फ्रिडमॅनला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीबद्दल चर्चा केली. अनेक वादग्रस्त आणि अगदीच वेगळ्या विषयांवर या मुलाखतीत त्यांनी आपली मते व्यक्त केली. या मुलाखतीत उडत्या तबकड्या म्हणजेच युएफओसंदर्भातही चर्चा झाली. युएफओ म्हणजेच परग्रहवासियांची वाहनं म्हणून समजल्या जाणाऱ्या उडत्या तबकड्यांबद्दल अमेरिकेबरोबरच जगभरामध्ये कुतूहल कायमच राहिलं आहे. असं असतानाच आता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या व्यक्तीने याबद्दल बोलल्याने पुन्हा या विषयाची चर्चा होताना दिसत आहे. भविष्यात अमेरिकेमधील संरक्षण दलाचं प्रमुख कार्यालय असलेल्या पेंटागॉनच्या माध्यमातून या उडत्या तबकड्यांचे व्हिडीओ सार्वजनिकरीत्या जारी करण्याच्या धोरणाला माझा पाठिंबा असेल, असं ट्रम्प म्हणाले. पेंटागॉनला सांगून तुम्ही यूएफओचे यापूर्वी न पाहिलेले आणि अधिक फुटेज जारी करायला सांगण्याची शक्यता आहे का, असं विचारलं. यावर उत्तर देताना ट्रम्प यांनी, 'मी नक्कीच हे करेन. मला हे करायला आवडेल. खरं तर मला हे केलं पाहिजे', असं उत्तर दिलं. त्यामुळेच ट्रम्प सत्तेत आल्यानंतर यापूर्वी कधीही सर्वसामान्यांपर्यंत न पोहोचलेली रंजक माहिती समोर येण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

## स्नायू बळकटीसाठी खा हेझलनटस्






निरोगी राहण्यासाठी तज्ज्ञ सुकामेवा खाण्याचा सल्ला देतात. अनेक जण आहारात ड्रायफ्रूटस्चा समावेश करतात. पण, खूप कमी लोकांना माहिती आहे की एक ड्रायफ्रूट जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ते म्हणजे हेझलनट किंवा पहाडी बदाम. त्याला कुल्थी किंवा चिलगोजा म्हणून देखील ओळखले जाते. याला काजू आणि बदामांपेक्षाही जास्त शक्तिशाली मानले जाते. विशेषतः जेव्हा शरीराला शक्ती आणि पोषण देण्याची गरज असते, त्यावेळी त्याचे सेवन अतिशय लाभदायक ठरते. शरीराच्या स्नायूंना बळकट करण्यासाठी, हाडांमध्ये लोहाची कमतरता भरून काढण्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी हे फायदेशीर आहे. हेझलनट्सच्या सेवनाने शरीराला अनेक फायदे मिळतात. पहाडी बदामामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने आढळतात. जे आपल्या स्नायूंना बळकट करू शकतात. कमकुवत बरगड्यांना मांस पुरवण्यास देखील ते मदत करतात. याच्या सेवनाने ताकद तर मिळतेच; पण कमी वजनाचे लोक देखील वजन वाढवू शकतात. ज्यांना कमकुवत स्नायूंचा त्रास आहे त्यांच्यासाठी हे उपयुक्त आहे. हा लोहाचा उत्कृष्ट स्रोत आहे, ज्याच्या सेवनाने तुमचा स्नायू बळकट करणारा हा आरोग्यदायी सुकामेवा अशक्तपणा दूर होतो. लोहाच्या कमतरतेमुळे ॲनिमियासारख्या समस्या देखील दूर होतात. लोहाच्या पुरवठ्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि हाडे मजबूत होण्यास मदत होते. त्यात ओमेगा – ३ फॅटी ॲसिड आढळते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी ते मदत करतात. हेझलनट्समध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते. जे हाडे मजबूत करतात. हाडे नैसर्गिकरित्या निरोगी ठेवण्यासाठी हा एक उत्तम स्रोत आहे. त्यामुळे त्याचा आहारात समावेश केला पाहिजे. शरीराला ऊर्जा देतात. त्यामुळे अशक्तपणा आणि थकवा टाळता येतो. हेझलनट स्नायूंना मजबूत तर करतातच आणि लोहाच्या कमतरतेवर मात करण्यास मदत करतात. यामुळे हाडांचे आरोग्य देखील सुधारतात. काजू आणि बदामांपेक्षाही अधिक शक्तिशाली आणि पौष्टिक आहे.

## ओझोनचे नवे शत्रू

सूर्याच्या हानिकारक किरणांपासून पृथ्वीचे व पर्यायाने जीवसृष्टीचे रक्षण करण्यात पृथ्वीभोवतीचा ओझोनचा स्तर महत्त्वाचे योगदान देत असतो. वातावरणातील या ओझोनचा ऱ्हास करणारे आणखी चार वायू सापडलेले असून, गेल्या ५० वर्षांत मानवी कृतींमुळेच ते वातावरणात गेले आहेत. बंदी घालण्यात आलेल्या संयुगांच्या वापरामुळे वायू वातावरणात मिसळून ओझोनच्या थराचा ऱ्हास झाला आहे, असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे.




१९९० मध्ये पृथ्वीच्या स्ट्रॅटोस्फिअरमध्ये असलेल्या ओझोनच्या थराची हानी करणारे हे वायू सोडले गेले; पण ते आता सापडले आहेत. युरोप व ऑस्ट्रेलियातील पथकाने याबाबत केलेले संशोधन नेचर जिओसायन्स या नियतकालिकात प्रसिद्ध झालेले असून, त्यांनी म्हटले आहे की, आम्ही असे नऊ वायू शोधून काढले आहेत, जे १९६० च्या सुमारास पृथ्वीच्या वातावरणात नव्हते व ते मानवनिर्मित आहेत. वैज्ञानिकांनी त्यासाठी प्रदूषित नसलेल्या टास्मानिया येथे हवेचे नमुने घेतले व ग्रीनलँडमधील बर्फाचे नमुने घेतले. या चार नवीन वायूंची ओळख पटवताना त्याचा उपयोग झाला, हे चारही वायू ओझोनच्या थराचा ऱ्हास करीत आहेत. हे नवीन वायू कुठून उत्सर्जित होत आहेत हे समजलेले नाही; पण ते शोधून काढले जातील. यातील तीन वायू हे क्लोरोफ्लुरोकार्बन गटातील आहेत तर चौथा हायड्रो फ्लुरोकार्बन गटातील आहे. क्लोरोफ्लुरोकार्बन हे वातानुकूलन, शीतकरण, स्प्रे कॅन यासाठी वापरले जातात. हायड्रो फ्लुरोकार्बन हे त्यानंतर आलेले घटक आहेत. नव्याने शोधलेल्या चार वायूंचे वातावरणातील प्रमाण काही वर्षांपूर्वी ७४००० टन होते.

## येतोय झेटा–क्लास सुपरकॉम्प्युटर

सध्याच्या सर्वात वेगवान सुपर कॉम्प्युटर्सना मागे टाकणारा पहिला झेटा–क्लास सुपरकॉम्प्युटर बनवण्याची तयारी जपानने केली आहे. पुढील वर्षांपासून हा सुपरकॉम्प्युटर वनवण्याचे काम सुरू होईल आणि २०३० पर्यंत हा सुपरकॉम्प्युटर सुरू होईल. हा सुपरकॉम्प्युटर बनवण्यासाठी ७५० दशलक्ष डॉलर्सपेक्षाही अधिक खर्च येणार आहे.

हा सुपरकॉम्प्युटर ज्यावेळी पूर्णपणे संचालित होईल, त्यावेळी तो सध्याच्या सर्वात वेगवान सुपर कॉम्प्युटर्सपेक्षा एक हजार पट अधिक वेगाने काम करील. हा सुपरकॉम्प्युटर २०३० पर्यंत पूर्णपणे ऑनलाईन होईल आणि त्याचा लाभ जपानला आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयच्या विकासाची गती वाढवण्यासाठी होईल. जपानच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने या नव्या मशिनची योजना सर्वप्रथम २८ ऑगस्टला जाहीर केली होती. मंत्रालयाने म्हटले आहे की झेटाफ्लॉप्स स्केल वर ता सुपरकॉम्प्युटरचा वेग पोहोचेल. इतका वेग यापूर्वी कधीही गाठलेला नाही. फ्लॉप्स म्हणजे फ्लोटिंग पॉईंट ऑपरेशन्स परसेकंड. एखादा कॉम्प्युटर गणितीय आकडेमोड किती वेगाने सोडवतो हे पाहण्यासाठीचे हे मोजमाप आहे. त्यामध्ये एक फ्लोटिंग–पॉईंट ऑपरेशन म्हणजे सिंगल कॅल्क्युलेशन असते. १ झेटाफ्लॉप्सचा वेग असलेला एखादा सुपरकॉम्प्युटर प्रत्येक सेकंदाला वन सेक्स्टीलियन म्हणजेच एकावर २१ शून्ये इतकी गणितीय आकडेमोड करू शकतो. सध्याच्या सुपरकॉम्प्युटरने एक्झाफ्लॉप्सचीच सीमा ओलांडलेली आहे. याचा अर्थ तो प्रत्येक सेकंदाला एकावर १८ शून्ये इतक्या गणितीय आकडेमोड करू शकतो.



## ‘सिद्धार्थ वाणी’



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

नाव बनवतो काम, नावानेच जीवन आणि जगाची फक्त नावानेच ओळखले जाते. टेररिकार्ड कितीदा भूत-भूत ओरडले, तरी काहीच फरक पडत नाही, परंतु घरातील सदस्याने ‘भूत आले’ एवढेच बोलले तरी सगळे घाबरतात आणि सावध होतात. माणसेच नव्हे तर प्राणी, पक्षीही घाबरतात. भगवंताचे नामस्मरण करतात.

रामापेक्षा रामाचे नाव मोठे आहे. जेव्हा सीतेचे अपहरण केल्यानंतर लंकेवर हल्ला करण्याची योजना आखली गेली, समुद्राच्या पलीकडे त्यासाठी समुद्रात पुल बांधला जात होता. नल-नील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सैनिक मोठ्या दगडावर रामाचे नाव लिहून समुद्रात फेकत होते. पुलाचे काम पाहून राम थक्क झाले. त्यात दगड फेकण्याचा विचार केला, पण राम एकांतात येऊन दगड टाकताच तो सर्वांसमोर कसा बुडाला? श्रीराम स्तंभ झाले. यात माझा कोणताच प्रभाव नाही फक्त नल-नीलच्या शक्तीचा प्रभाव आहे, तेव्हा हनुमान हसत म्हणाले, प्रभु मी तुमचा पराक्रम पाहत होतो. ‘‘हनुमान मी तेच विचार करत आहे माझ्याने सोडलेले दगड बुडाला.’’ हनुमान म्हणाले, ‘‘प्रभो! हे घडणारच होते. जो तुमच्या आधारापासून दूर जाईल तो नक्कीच बुडेल, हेच तर नावाचे काम आहे.’’

चिंतामणीरत्न कामधेनू कल्पवृक्ष यापेक्षा भगवंताचे नाव अधिक मौल्यवान आहे. एका बाजूला भगवंताच्या नामाचा एक अणिका आहे, तर दुसऱ्या बाजूला हजारो लाखो पाप आहेत. अवघा रती हे नावही हृदयात शिरले तर लाखो पापेही जळून राख होतात. अग्नी, चोर, समुद्रा इ. सर्व भय भगवंताच्या नामाने नाहीसे होतात. बायबलमध्ये असेही म्हटले आहे, सर्व शक्तिमान देव त्याच्या नावाने सर्व पापांचा नाश होतो. भगवंताचे नाम घेतल्याने जीभ शुद्ध होते आणि भगवंताचे रूप पाहून डोळे शुद्ध होतात. भक्तिभावाने नामजप केल्याने मन तेजस्वी व शुद्ध होते. नावातच सर्व काम होतात.

**– सौ. सविता चोरडिया**

# ‘शब्द नव्हे, वचन’ या संकल्पनेवर काम करणार : अभिषेक कळमकर

### भिंगार कॅन्टोन्मेंट परिसरात प्रचारफेरी

नगर – नगर शहरातील भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्ड परिसरात महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक बाळासाहेब कळमकर यांनी नागरिकांशी संवाद साधला. या प्रचार दौऱ्यात भिंगार भागातील प्रत्येक कुटुंबातील माता-भगिनींनी औक्षण करून कळमकर यांना विजयीभव असा आशीर्वाद दिला. या औक्षणातून कळमकर यांना या भागातील महिलांचा विश्वास आणि पाठिंबा मिळाल्याचे दिसून आले, ज्यामुळे प्रचार फेरीत उत्साह वाढला, असे कळमकर यांनी सांगितले.



भिंगार कॅन्टोन्मेंट परिसरात निवडणूक प्रचारफेरीदरम्यान महाविकास आघाडीचे उमदेवार अभिषेक कळमकर यांचे औक्षण करताना महिला.

उमेदवार अभिषेक कळमकर यांनी भिंगारबद्दल असलेली जवळीक यावेळी सांगितली. ‘भिंगार आणि माझं नातं खूप जवळच आहे. माझ्या शाळेतील सवंगडी मोठ्या प्रमाणत भिंगारमधील होते व त्यामुळे माझ्या शालेय आयुष्यातील प्रत्येक रविवार हा इथेच जात असे, मग ते हॉकी ग्राउंड असो व कॅन्टोन्मेंट स्कूल चे ग्राउंड.’

प्रचार दौऱ्यातील संवादादरम्यान कळमकर यांनी नागरिकांना होणाऱ्या अडचणींविषयी सविस्तर माहिती घेतली. पाणीपुरवठ्यातील अडचणी, निकृष्ट रस्ते, अपुरी कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालयांचा अभाव, वीजपुरवठा, तसेच मूलभूत सुविधांची कम तरता यासारख्या प्रश्नांवर नागरिकांनी आपली नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांना विकासाच्या नावाखाली फक्त आश्वासने मिळाली आहेत, परंतु या समस्या कायम तशाच राहिल्या आहेत, असे अनेकांनी सांगितले.

अभिषेक कळमकर यांनी या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आश्वासन दिले. शब्द नव्हे, वचन देत आहे की, भिंगार परिसरातील विकासासाठी आपली संपूर्ण ताकद लावणार आहे. या भागातील नागरिकांना दिलासा मिळेल, असे ठोस प्रयत्न मी करीन, असा विश्वास कळमकर यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित नागरिकांनी कळमकर यांच्या या आश्वासनावर पूर्ण विश्वास दाखवला. नागरिकांनी या वेळी विकासाच्या नावावर मारलेल्या भुलथापांचा पाढा वाचला गेला. आमच्या भागातील समस्यांवर सोडवणूक करण्यासाठी आम्ही यंदा अभिषेक कळमकर यांना पूर्ण पाठिंबा देऊ, असा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.

या प्रचार दौऱ्यात महाविकास आघाडीचे युवा सेना सचिव विक्रम राठोड, ओंकार सातपुते, भिंगार शिवसेना प्रमुख प्रतीक भंडारी, राजु दहिंडे, भिंगार काँग्रेस अध्यक्ष सागर चाबुकस्वार, संतोष धीवर, बाबासाहेब भिंगारदिवे, भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) अध्यक्ष किरण सपकाळ, भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) युवा अध्यक्ष श्रवण काळे, अल्पसंख्याक शहर अध्यक्ष तोफिकभाई शेख, भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष सचिन नवगरे, राकेश जगधने, अर्जुन माळवे राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष अशोक भोसले, संदीप नावगिरे, रवी बडदे, यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते, तरुण मित्र मंडळाचे सदस्य आदी सहभागी झाले होते. या निवडणुकीत विजयाचा गुलाल उधळणारच, असा आत्मविश्वास कळमकरांनी व्यक्त केला, आणि या क्षेत्राच्या विकासासाठी संकल्पबद्ध असल्याचे सांगितले.

शब्द नव्हे, वचन या भावनेतून काम करण्याचा संकल्प घेतलेल्या अभिषेक कळमकर यांनी भिंगार परिसराच्या विकासासाठी आपली सर्वतोपरी मेहनत करणार असल्याचे नागरिकांना आश्वस्त केले.

# मनसेची उमेदवारी नगर शहराच्या विकासासाठी

**सतिष नारकर यांचे प्रतिपादन; मनसेचे अधिकृत उमेदवार सचिन डफळ यांच्या प्रचाराचा श्री विशाल गणपती मंदिरात महाआरतीने शुभारंभ**

नगर – नगर शहरातील युवकांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे विचार पटत आले आहे. राज ठाकरे यांनी जे विकासाचे व्हिजन तयार केले आहे. त्यामाध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहे. तसेच नगर शहरातील अनेक प्रलंबित प्रश्न हे देखील मनसेच्या माध्यमातून यापूर्वी मार्गी लागले आहेत. त्यामुळेच नगरशहर विधान सभा मतदार संघासाठी सक्षम उमेदवार म्हणून मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांची निवड करण्यात आली ती सर्वांच्या सहकार्याने सार्थक ठरविली जाईल, असे प्रतिपादन मनसेचे पक्ष निरिक्षक सतिष नारकर यांनी केले आहे.

मनसेचे विधान सभेचे अधिकृत उमेदवार सचिन डफळ यांच्या प्रचाराचा शुभारंभ सतीश नारकर यांच्या हस्ते झाला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मनोज राऊत, महिला जिल्हाध्यक्षा ॲड. अनिता दिघे, शहर सचिव डॉ.संतोष साळवे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, वाहतूक सेना शहराध्यक्ष अशोक दातरांगे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, शहर उपाध्यक्ष किरण रोकडे, शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे, शहर उपाध्यक्ष दीपक दांगट, विभाग अध्यक्ष महेश चव्हाण, अनिकेत शियाळ, अमोल भालसिंग आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मनसेचे जिल्हाध्यक्ष व विधानसेभेचे अधिकृत उमेदवार सचिन डफळ म्हणाले की, नगर शहरात मागील काही वर्षापासून मनसेचे काम हे चांगले सुरु असून या कामाची दखल घेऊनच पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांनी नगरमध्ये माझी उमेदवारी जाहिर केली. नगरमध्ये मनसेच्या माध्यमातून विविध आंदोलन, सामाजिक प्रश्न हाती घेण्यात आले होते. ते मनसेने योग्य रितीने मार्गी लावली. आजही मनसेच्या मागे मोठा जनसमुदाय असून त्या माध्यमातून ते येणाऱ्या विधान सभेसाठी निश्चितच बदल घडवतील यात शंका नाही, असे त्यांनी सांगितले.



मनसेचे विधान सभेचे अधिकृत उमेदवार सचिन डफळ यांच्या प्रचाराचा शुभारंभ पक्ष निरीक्षक सतीश नारकर यांच्या हस्ते झाला.



नालेगाव अमरधामला बादल्यांची भेट देताना विजय भालसिंग, ॲड. महेश शिंदे, राजेंद्र वनारसे, मेजर शिवाजी वेताळ आदी.

# शहरातील अमरधामला बादल्यांची भेट

### दिवाळी पाडव्यानिमित्त उपक्रम

नगर – शहरातील नालेगाव येथील महापालिकेच्या अमरधामला दिवाळी पाडव्यानिमित्त विजय भालसिंग यानी बादल्यांची भेट दिली. अंत्यविधीसाठी आलेल्या कुटुंबीयांनी होणारी गैरसोय टाळण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

अमरधामचे व्यवस्थापक स्वप्निल कुऱ्हे यांच्याकडे बादल्या सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी जय युवा ॲकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, सुहास सोनवणे, छावा संघटनेचे रावसाहेब काळे, अखिल भारतीय सेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वनारसे, ओम चैतन्य गोशाळेचे अध्यक्ष मेजर शिवाजी वेताळ, भाजपचे बाळासाहेब पाटोळे, रयत प्रतिष्ठानचे सचिव पोपट बनकर, सामाजिक कार्यकर्ते अशोक कासार, सूर्या मॉर्निंग ग्रुपचे राजकुमार चिंतामणी आदी उपस्थित होते.

विजय भालसिंग म्हणाले की, अमरधाममध्ये अंत्यविधीसाठी आलेल्या आप्तेष्ट, नातेवाईक यांना प्रथेनुसार आंघोळ करावी लागते. यावेळी एकाचवेळी अनेक अंत्यविधी असल्यास बादल्यांची कमतरता भासते. अशा दु:खाच्या प्रसंगी आलेल्या नागरिकांची धावपळ व गैरसोय होऊ नये म्हणून अमरधामला बादल्या भेट देण्यात आल्यचे त्यांनी स्पष्ट केले. तर दु:खात व अडचणीच्या काळात सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा हात देणे, ही खरी माणुसकी असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. महेश शिंदे म्हणाले की, पक्ष्यांपासून ते मनुष्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे कार्य सामाजिक उपक्रमाद्वारे भालसिंग करत आहे. उन्हाळ्यात पशु-पक्ष्यांना पाण्यासह अन्न-धान्य व कृत्रिम घरटे बसविण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी राबविला. समाजाचे ऋण फेडण्यासाठी माणुसकीच्या भावनेने प्रत्येकाने योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.

# मानव सेवा प्रकल्पास किराणा व वस्तू भेट

नगर – सोनेवाडी येथील अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळामार्फत मनोरुग्ण लोकांसाठी मानव सेवा प्रकल्पाच्या माध्यमातून मनोरुग्णांची सेवा केली जाते. येथे ८० ते ८५ मनोरुग्न असून ५० ते ६० महिला म्हणून रुग्ण आहेत. यात बाहेर राज्यातील ही रुग्ण आहेत. या प्रकल्पास रेल्वे स्टेशन येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने सामाजिक भावनेतून संघाचे अध्यक्ष के डी खानदेशे यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य नानासाहेब दळवी व शामला साठे यांच्या हस्ते किराणा साहित्य व भेटवस्तू देण्यात आल्या.



अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळातील मानव सेवा केंद्रास ज्येष्ठ नागरिक संघ स्टेशन परिसराच्यावतीने अध्यक्ष के डी खानदेशे यांच्या मार्गदर्शनाखाली किराणा साहित्य व भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी संघाचे सदस्य नानासाहेब दळवी, शामला साठे आदी. (छाया – समीर मन्यार)

### ज्येष्ठ नागरिक संघ स्टेशन परिसर संघाचा उपक्रम

ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने नेहमी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. समाजापासून वंचित असलेल्या घटकांचा विचार करून त्यांना मदतीचा हात दिला जातो .वृद्धाश्रम असो दिव्यांग असो हे पण आपल्या समाजाचे घटक आहेत त्यांना आधाराची गरज आहे . समाजातील सर्व संस्थांनी मिळून सामाजिक बांधिलकी जपत त्यांच्या जीवनातील अंधार दूर करून प्रकाश देण्याचे कार्य करावे असे संघाचे अध्यक्ष के. डी. खानदेशे यांनी सांगितले.

यावेळी संघाचे सदस्य नानासाहेब दळवी यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ दिवाळी भेट म्हणून केंद्रातील स्त्रियांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

# भूमिपुत्रांच्या यशात गावाचाही महत्वाचा वाटा : प्रा.डॉ.आर.के.आहेर

नगर – यश मिळविण्यासाठी शिक्षणाचे महत्व, तसेच आपल्या यशात सर्वप्रथम आपल्या पाठीशी आपला गाव प्रथम उभा राहतो, त्यावेळी तो क्षण युवकांना अधिक प्रेरणादायी आहे. तसेच भूमिपुत्रांनी मिळवलेल्या यशात गावाचा ही महत्वाचा वाटा असतो. गावाची कौतुकाची थाप या प्रेरणासोहळ्याचे रुपाने त्यांना प्रेरित करत असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ.आर.के.आहेर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. व सन्मान सोहळा हा जय जवान, जय किसान, जय विज्ञान या नाऱ्याला अनुसरून असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या श्री कोरठण खंडोबा देवस्थान पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा माजी विद्यार्थी संघ व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने गावातील नवयुवकांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे यासाठी गावातील विविध क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केलेल्या युवकांचा सन्मान सोहळा दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर झाला.



पिंपळगाव रोठा माजी विद्यार्थी संघ व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने गावातील नवयुवकांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे यासाठी गावातील विविध क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केलेल्या युवकांचा सन्मान करण्यात आला.

### पिंपळगाव रोठा येथे माजी विद्यार्थी संघ व ग्रामस्थांच्यावतीने भूमिपुत्रांचा सन्मान

या सोहळ्यात गावातील शिक्षण, वैद्यकीय, कृषी, व्यवसाय, नोकरी, क्रीडा, संगीत इत्यादी क्षेत्रात यश संपादन केलेल्या गावातील २३ युवकांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्री ढोकेश्वर कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर गावातील माजी सैनिक मथा घुले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शिक्षण विस्तार अधिकारी संभाजी झावरे यांची आवर्जून उपस्थिती लाभली.

यावेळी अध्यक्षीय भाषणात माजी सैनिक मथा घुले म्हणाले की, गावातील प्रत्येक युवकाने निर्धार करून मेहनत आणि कष्टाच्या बळावर यशाचे पदक घेऊन गावभूमीत आल्यास गावाला अभिमान वाटेल असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमात गावातील संरक्षण दल, सागरी दल, अग्निशामक दल, महाराष्ट्र पोलिस दल, भारतीय सेना दल अशा विविध क्षेत्रात कामगिरी केलेल्या विद्यमान तसेच सेवानिवृत्त अश्या एकुण २३ जवानांचाही सन्मानचिन्ह, शाल,श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. आदर्श गोपालक म्हणून सुजीत लोळगे आणि परिवार यांच्या वतीने दिला जाणारा वत्सला पुरस्कार २०२४ गावातील तरुण सत्यवान बाळासाहेब घोडके व परिवाराला देऊन सन्मानित केले. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम रुपये ३०६९, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह असे होते.

प्रास्ताविक उत्तम सुंबरे, सूत्रसंचालन राजाराम शिंदे, राजाराम मुंढे यांनी केले तर जिजाभाऊ घुले यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजन समितीतील संतोष जाधव (भारतीय आर्युविमा प्रतिनिधी), वसंत जगताप, सुरेश घुले, शमशुद्दीन हवालदार, खंडु फापाळे, बाळासाहेब मुंढे, वसंत पुंडे, शहाजी शिंदे, यांनी आपले मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती लाभली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

